काव्य १०५१

७०७१०३६

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे यास
सप्रेम नजर

वसंत रामकृष्ण वैद्य
२१.४.३६

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं. ११८.२
ता. २५-७.३५
ठाणे.

५४०८

१०८

# बहर

## वसंत

यांच्या निवडक कवितांचा संग्रह

REFBK-0005504
REFBK-0005504
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५५०८

प्रकाशक,
**महाराष्ट्र प्रकाशन संस्था**
मुंबई नं. ४.

प्रकाशक,

**गो. गो. अधिकारी**

गोवर्धनभुवन, खेतवाडी, मुंबई नं. ४.

किंमत रु. १

[ भाषांतर, पुनर्मुद्रणादि सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन आहेत. ]

मुद्रक,

**एस. व्ही. परुळेकर**

मुंबईवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई.

# अनुक्रम


| | पृष्ठ |
|---|---|
| **आगम** ... ... | |
| **आस्वाद**—कवि-यशवन्त | १ |
| भरंवसा ... ... | १९ |
| निदिध्यास ... ... | २० |
| जलल्हरी ... ... | २१ |
| नर्तकी मी उर्वीबाला ... | २३ |
| तारका ... ... | २४ |
| रस्त्याचें गाणें ... | २५ |
| इन्द्रधनुष्य ... ... | २७ |
| ढगांचें आयुष्य ... | २८ |
| पृथ्वीचा पाळणा ... | ३० |
| चोरी ... ... | ३२ |
| कांगांव ... ... | ३३ |
| फसवा व्यवहार ... | ३४ |
| सौंदर्यप्रतीति ... | ३५ |
| साद व पडसाद ... | ३६ |
| वेड ... ... | ३७ |
| प्रतीक्षा ... ... | ३८ |
| संमीलन ... ... | ४० |
| आंत व बाहेर ... | ४१ |
| चुटपुट ... ... | ४२ |
| खुळें प्रेम ... ... | ४३ |
| तुझें चालणें ... ... | ४४ |
| मोटेवरील गाणें ... | ४५ |
| ओढ ... ... | ४६ |
| मोहनी ... ... | ४७ |
| आज ... ... | ४८ |
| हिमाङ्गी ... ... | ४९ |
| शब्दार्थ ... ... | ५० |
| आसुरी प्रीति ... | ५१ |
| शान्तिपूजन ... ... | ५३ |
| जगण्यासाठीं हें मरणें ... | ५५ |
| आतां काय तयाचें ... | ५६ |
| लायकी ... ... | ५७ |
| सये मी मोठ्यांच्या घरची | ५८ |
| अभय ... ... | ६० |
| भाववल ... ... | ६१ |
| प्रीतीचें नातें ... ... | ६२ |
| माझा परमेश ... | ६३ |
| सत्य आणि भास ... | ६४ |
| मूर्तिपूजा ... ... | ६५ |
| भाग्यवन्त ... ... | ६६ |
| देव ... ... | ६७ |
| विरोध ... ... | ६८ |
| हिरकणी ... ... | ६९ |
| परता देऊन शाप ... | ७० |
| मजूर ... ... | ७१ |
| झांशीची राणी ... | ७३ |
| जिवाची परवशता ... | ७४ |
| धूलिकण ... ... | ७५ |
| संकटास ... ... | ७६ |
| माझें गाणें ... ... | ७७ |
| कीर्ति ... ... | ७८ |
| जाणतें बाल्य ... | ७९ |
| सौंदर्यदृष्टि ... ... | ८१ |
| उन्हाळा ... ... | ८३ |
| मूक राहुनीच ... | ८४ |

# आगम

१९२९ सालीं चाळयानें एक कविता लिहिली. परंतु काव्यप्रांताकडे मनानें ओढ घेतली १९३२ सालापासून. या गेल्या चार वर्षांत जें अनुभविलें तें आज एकत्रित करून रसिकांपुढें ठेवीत आहे. काव्यगायनामुळें रसिकांची थोडीफार झालेली ओळख दृढ करण्याचा हा प्रयत्न आहे. या कृतीमध्यें काय नाहीं हें पाहण्यापेक्षां काय आहे हेंच पाहण्याची रसिकता दाखविली जावी अशी विनंति आहे. पर्णकुटिकेचें सौंदर्य पाहतांना तींत ताजमहालाची कारागिरी नाहीं, गोल घुमटाची कल्पकता नाहीं, कुतुबमिनारची उत्तुंगता नाहीं, असें म्हणण्यापेक्षां तींत काय आहे, तिचें सौंदर्य कशांत आहे हें जाणण्यांतच खरी रसिकता प्रकट होत नाहीं काय? बहर! मग तो अन्तःसृष्टींतील असो वा बाह्यसृष्टींतील असो. सौंदर्यवर्धन व आनंदनिर्मिति एवढेंच त्याचें कार्य! या परत्या कार्याकरितां त्याचें प्रयोजन नाहीं.

माझ्या तपश्चर्येला अर्ध तपहि झालें नाहीं तोंच आपली कृति रसिकांपुढें मांडण्याचें भाग्य माझ्या वांट्याला आलें त्याला कारण सर्वस्वीं माझे प्रेमळ स्नेही. महाराष्ट्र प्रकाशन संस्थेचे चालक श्री. गो. गो. अधिकारी यांची आपुलकी, श्री. अ. स. ओळतीकर यांचें प्रोत्साहन, प्रियमित्र श्री. सि. चिं. ब्रह्मे, श्री. भ. दि. गाड्गिल, श्री. रा. म. आठवले, श्री. ल. दा. सुळे, यांचें सौहार्द यामुळेंच हा आनंदाचा दिवस उजाडला आहे.

केवळ अल्पपरिचय असतांहि कवि यशवन्त यांनीं माझ्या 'बहरा'च्या सौंदर्याचें दिग्दर्शन व बहुमोल सूचना करून मला ऋणी करून ठेविलें आहे. आभारांच्या औपचारिक परतफेडीनें त्या ऋणांतून मुक्त होण्याची माझी इच्छा नाहीं.

इतर स्नेहीजन, ज्यांनीं निरपेक्ष प्रेमानें मला सहाय्य केलें त्या सर्वांचा मी आभारी आहें. माझ्या विनोदी कवितांवर मोहित झालेल्या माझ्या रसिक श्रोत्यांना यावेळीं मी इतकेंच आश्वासन देऊं इच्छितों कीं विनोदी कवितांचा स्वतंत्र संग्रह लवकरच मी त्यांच्या हवालीं करणार आहें. मात्र प्रस्तुत संग्रहाचें योग्य तें स्वागत करण्याची आपुलकी त्यांनीं दाखविल्याविना मी काय करूं शकणार?

नाईक यांची चाळ,
नौपाडा, ठाणें २३ मार्च १९३६

रसिकांचा ऋणी,
**वसंत रामकृष्ण वैद्य**



वसंत

मराठी ग्रंथ संग्रहालय,
स्थळ प्रत
सं. ............ नं. ............
ता. ............
ठाणे.

७४०८
कार्य १११२
ता. २५।७।३६
ठाणे.

# आस्वाद

प्रस्तुत कवि आणि कवितासङ्ग्रह यांच्या नांवांतील अन्योन्य सम्बन्ध लक्षांत घेता, निसर्गाच्या स्वभावधर्माची साक्ष रसिकाला—सामान्य वाचकालाही पटणार आहे. वैद्यानें रुग्णाइताची नाडी हातांत धरायची आणि त्याच्या प्रकृति-विकृतीचें निदान करून अनुपानखर्डा लिहून द्यायचा व पथ्यपाणी सांगायचें असतें. अशा तऱ्हेनें मानवी विविध व्यथांची चिकित्सा करणाऱ्यानेंही फुला-फुलांतील कणाकणानें जमवलेल्या मधाची महती ठाऊक करून घेतली आहे; कांहीं कांहीं विकृतींत सुवासिक फुलांचा उपयोग करतां येतो हें हेरून ठेविलें आहे; गुलाबपाकळ्यांना खडीसाखरेंत मुरवून सिद्ध होणाऱ्या स्वादिष्टतेचें सामर्थ्य आजमावून पाहिलें आहे; आणि द्राक्षासव, डाळिम्बार्कमधु इत्यादिकांचे गोडवे गायिले आहेत. निरोगी मनुष्यालाही, आजारी असल्याचा बहाणा करावा, असा मोह पाडणारी ही औषधयोजना! वैद्याच्या औषधालयांतही अशी अव्वल रसिकता आढळते. मग अशा रसिक वैद्यानें 'वसन्त'रूपच धारण केल्यावर त्याच्या काव्यलतेला 'बहर' यावा यांत काय आश्चर्य! ज्याच्या काव्यलतेला बहर आला आहे अशा वैद्याच्या हातांत आपली प्रकृति द्यायला कोणी दुखणेकरी तयार झाला तर दुखणेकऱ्याचे नातेवाईकच त्या दुखणेकऱ्याची विकृति मेन्दूची ठरवून त्याला ठाण्यांतील दुसऱ्याच संस्थेकडे जबरदस्तीनें नेण्याचा घाट घालतील. पण ही झाली सामान्य व्यवहारी जनांची गोष्ट. व्यावहारिक वाच्यार्थाला जरा बाजूला ठेवून कोणी विचार करील तर खरोखरीच, वैद्यकीलाही आकळतां न आलेल्या आजारानें विकल झालेले लोक—सर्व साधारण रसिक—ह्या वैद्याच्या भोंवतीही जमलेले दिसतील; आणि त्या जमा झालेल्यांच्या साक्षी घेतल्यास त्यांतून असेंच निष्पन्न होईल कीं ज्यांच्या काव्यलतेला बहर आला आहे असे वैद्यराजच आमच्या दुःखीकष्टी मनाला आराम देऊं शकतात; आमच्या "व्याधींच्या गुरु-वेदना" शमविण्याची ताकद ह्या वैद्यराजाजवळ आहे. रोग्याचा हात हातांत घेऊन नाडी तपासणें किंवा पोटापाठीला नळ्या लावून ठोके मोजणें; डोळ्याच्या पापण्या फाकून किंवा जिभा बघून त्यांचा रक्तिमा आजमावणें; असले न्यास करण्याची जरूरी ह्या कविवैद्याला नसते. रस्त्यानें जाणाऱ्या विधवेच्या डोळ्यांत

तरळणाऱ्या एकाद्या अश्रुबिन्दूनें तिचें शल्य डोळ्यांत नसून अन्तःकरणांत आहे हें तात्काळ ओळखून त्याची मीमांसा तो करूं शकतो. मजुराच्या पोटापाठींतील शिलकांची मोजदाद व वारयोषितेच्या सौन्दर्यांतील (किंवा सौन्दर्याच्या मुलाम्या-आंतील) भकास कडवटपणा ह्यांचा इतिहास त्याला बरोबर समजतो. पूर्व-पश्चिम-सुन्दरींच्या कपोलावरील गुलाबी छटांचें रहस्य तो उलगडून दाखवूं शकतो. मधेंच पदर सांवरणें, बोलतांबोलतां अवचित आडखळणें आणि अधो-वदन होऊन पदनखाग्रांनीं भुई खरवडणें, असल्या लीला करणाऱ्या मुग्धेचें मनोविश्लेषण त्याला सहज साधतें. आणि शेवटीं, सुश्रुत, वाग्भट, चरक पारंगत असलेल्या वैद्यालाही ' हातगुण ' म्हणून एक प्रकारची सिद्धि ज्याप्रमाणें असावी लागते, त्याचप्रमाणें कविवैद्याचेंही नुसत्या अध्ययनानें निभत नाहीं; त्या अध्ययनालाही, लोकांच्या काळजाला हात घालण्याच्या एका अचुक (आणि म्हणूनच दिव्य अशा) प्रतिभेची जोड हवी असते. आणि बंगाली-हिन्दींत वैद्याला कविराज म्हणतात ह्यांत तरी हाच अभिप्राय नसेल काय?

वसन्तराव वैद्य विशी-पंचविशींतच वावरत आहेत, असें सांगितलें म्हणजे त्यांच्या काव्यलतेला बहर येणें किति उचित आहे हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. सृष्टींमधला वसन्त म्हणजे मानवी जीवितांतील तारुण्य होय. आजूबाजूला सध्यां नजर टाकली तर आम्रतरूवर डोलणाऱ्या भरगच्च मोहरांचे तुरेच तुरे दिसून येतील आणि त्यांच्या आडोशाला बसून गाणाऱ्या कोकिळांचें कूजित कानीं येईल. मनुष्यमात्राला आपल्या भविष्य कालाच्या समृद्धिची कल्पना करून देणारा आणि मनाला जाग आणणारा काल–मोहरून टाकणारा काल म्हणजे तारुण्य. आपल्याला सांपडलेल्या किंवा आपणावर लादलेल्या कार्याच्या पटां-गणावर तो उभा असतो; आणि चालून आलेल्या प्रदेशांतील–बाल्य व विद्यार्थिदशा ह्या पुष्पवाटिकांतील मनोरमतेची, ती हरपल्यामुळें, तीव्रतेनें जाणीव होत असते. अशा वेळीं मनांत उलटसुलट वायुलहरींचे कल्लोळ माजून राहतात आणि त्यायोगें भावजलाशयावर लाटांचें नृत्य सुरूं होतें. ज्या वास्तव भूमीवर तो उभा असतो ती भूमी त्याच्या आवडीनुरूप त्याला लाभली असल्यास त्याच्या मनांत भाविकालाविषयीं अनेक भव्य आणि मनोहर स्वप्नें तरळूं लागतीलच लागतील; पण दैवयोगें अप्रिय वातावरणांत त्याला पडावें लागलें असलें तरी त्यांतून निसटून निघण्याविषयीं त्याची धडपड चालू होईल. ह्या सर्व

व्याप-आटोपांतून, म्हणजे तन्द्राळूपणा आणि झुंजारपणा ह्यांतून जे सूर घुमूं लागतात त्यांचें लेखन म्हणजेच काव्य !

नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या आणि सभासम्मेलनांतून ऐकावयास मिळालेल्या कवितांपैकीं ज्या कांहीं कविता प्रस्तुत संग्रहांत आल्या आहेत त्यांनीं वरील सर्वसामान्य विवेचनाची साक्ष स्थूल मानानें पटवून दिलीच आहे. पण जीं तदितर कवनें इथें समाविष्ट करण्यांत आलीं आहेत त्यांतूनही वाचकांना ठायीं ठायीं वरील विवेचनाचें प्रत्यन्तर येईल. वसन्तराव वैद्यांचा हा ऐन पहिल्या तडफेचा बहर असूनही त्यांच्या भावी वैभवाची कल्पना करून देण्यास समर्थ आहे. फळझाडाचा पहिला बहर तितकासा चविष्ट व रसाळ नसतो हा बागाईत-वाल्यांचा अनुभव आहे. परन्तु काव्यसृष्टींत असेंच कांहीं मानायला नको. पुढचीं फळें अधिक रससिद्ध, स्वादिष्ट आणि विपुल येतील असें मानण्यास हर-कत नसूनही, आला हा बहर हिणकस आहे असें म्हणण्याचें कारण नाहीं.

आरम्भींचीच कविता घ्या. कवीची मनःप्रवृत्ती पुष्कळच आशावादी आणि आणि आत्मविश्वासपूर्ण आहे. साधारणपणें कवीच्या मनोवृत्तींत आढळणारा दर्प किंवा अतीशय विनयशीलतेचा आविर्भाव ह्यांचा बिलकुल आविष्कार न करतांही, कवीचा विश्वस्त आणि धीमा स्वभाव व्यक्त करते. कवि मनाची उभारी If winter comes, can spring be for behind ह्या वचनाचा अनुवाद करीत आहे. परमेश्वराच्या दयाळुत्वाची कवीस खऱ्या भाविकाप्रमाणें खात्री असून, अखण्ड वाहणारी त्याच्या दयेची झुळुक माझ्याच कळीला आवर्जून डावलून जाणार नाहीं हा भरवंसा बोलून दाखवितांना, मातृवात्सल्याचा दाखला देण्यांत आला आहे. परमेश्वराच्या ठिकाणीं मातृवात्सल्याचा आरोप करणें ही अगदीं सनातन विचारसरणी आहे. तथापि ह्या कवितेंत तिचा आविष्कार विशेष मार्मिकपणानें केला आहे आणि म्हणूनच तो विशेष हृदयंगम वाटत आहे—

साङ्गतें बाळ का " भूक मला लागली " ?
टळतांच भुकेची वेळा व्याकूळ होय माउली.

ह्याच्याही पेक्षां अधिक आत्मविश्वासाची छटा " भाग्यवन्त " ह्या अभङ्गांत आढळेल. " आयुष्यक्रमणांत निभावून जायला, यशस्वीपणानें पार पडायला हवें असलेलें अव्यङ्ग शरीर मिळालेलें आहे, सारासार विचाराचें भाण्डवलही

लाभलेलें आहे, आणि झगडण्यासाठीं उत्साहसामर्थ्य दिलें आहेस. सारांश सर्व कांहीं यथास्थित आहे अशा तऱ्हेचा मी भाग्यवन्त असतांना, देवा, तुझ्या दारीं याचक म्हणून येऊन कशाला उभा राहूं" अशा सन्तुष्ट वृत्तीचे बोल ह्या अभङ्गांत आढळतात. दुसऱ्या एका अभङ्गांत, परमेश्वराच्या शोधासाठीं रानोवनीं भटकण्याचें कारण नाहीं, बसल्या जागीं त्याला भावबळानें खेचून आणतां येईल असें त्यांना वाटतें;–आणि तें यथार्थ नाहीं का? पुण्डलिकासाठीं विटेवर तिष्ठत उभा राहणारा विठोबा, "दयाघन भक्ती आकळिला" हा कबूलीजबाब युगानुयुगें देत नाहीं का आला? तथापि कवीच्या परमेश्वरविषयक कल्पना एव्हढ्यावरच संपलेल्या नाहींत. त्यांचा अधिक विलास दाखविणारेही अभंग पुढें आहेत. जीवितयात्रेंमधील अनेक व्यापतापांनीं रंजीस येणाऱ्या प्राण्यानें अगदीं भग्नाश होऊन जाऊं नये व त्याच्या चित्ताला शान्ति आणि उद्यांसाठीं नवा उत्साह लाभावा म्हणून 'देव' ह्या कल्पनेच्या रूपानें एक प्रकारची मदिराच निर्माण करण्यांत आलेली आहे. अर्थांतच मग मूर्तिपूजेची मीमांसा काय? तर—

**पूजा अर्चा माझ्या नेत्रांचें पारणें**
**फिटाया कारणें व्याप सारा**

* *

**नेसवीते साडी बाहुलीला बाळी**
**हसूं कुण्या गालीं ओसण्डतें?**

* * *

**सौन्दर्याचा माझ्या जिवाला हव्यास**
**काय निर्गुणास चाड त्याची?**

अशा प्रकारची ती एक सौन्दर्यसमीक्षाच होय. 'मूर्तिपूजेचा इतकाच अर्थ केल्यावर व परमेश्वर ही एक रंजल्यागांजल्या मनाचे श्रम परिहार करणारी मदिरा आहे असें म्हटल्यावर कवीच्या तत्वज्ञानाला कशानें पूर्तता येत आहे.' असा प्रश्न उद्भवतो. त्या प्रश्नार्थक नजरेनें कुणी जर 'संसारांत रमला, देवाला विसरला' असा कवीबद्दल अभिप्राय देण्यास प्रवृत्त झाला तर कवीला त्याची

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७४०८
काव्य ११४२
स्थानक

फारशी फिकीर नाहीं. "म्हणणारे काय म्हणायचें तें खुशाल म्हणोत. त्या आक्षेपकांच्या समजुतीप्रमाणें उगाच अवडम्बर माजवायला मला अवसर नाहीं–

**मूक राहूनीया वाहतों मी ओझें**
**घेतलें जें माझें म्हणोनीया.**

कर्तव्य तेव्हढें मी जाणतों; तोच माझा परमेश" असें कवीनें निक्षून सांगितलें आहे. परमेश्वराच्या शोधासाठीं गिरिकन्दर–माळरान भटकत फिरणें म्हणजे सावलीला पकडू पाहून आत्मवञ्चना करून घेणें आहे.

**कवटाळिलें माझें मला मीच जेव्हां**
**आलिंगिली तेव्हां साउलीही**

अशा आत्मसंशोधनांत कवीच्या तत्वज्ञानाची परिसमाप्ति झाली आहे.

कवीची ही एकुण विचारसरणी निखालस स्वयम्भू नाहीं. अशा तऱ्हेचे उद्गार पुष्कळ विचारवंतांनीं पूर्वीं काढले असतील. तथापि त्या दुसऱ्या विचारवंतांच्या उद्गारांचे केवळ निनाद म्हणजेच ह्या कविता होत, असें नाहीं. खुद्द कवीच्या अन्तःकरणांत तसा प्रत्यय, आपल्या मार्गक्रमणांत आला असून त्या प्रत्ययांतून ही अभङ्गवाणी बाहेर उमटली आहे अशी वाचकांची खात्री पटण्यासारखी तीमधें अनुभवाची बोली आढळून येईल. सिद्धान्ताचा पुनरुच्चार बोलणाऱ्याच्या प्रत्ययांतून झाल्यानेंच त्याला मूळ सत्यासारखें मोल येऊं शकतें. वेलीवर आज विकसलेल्या फुलांसारखींच उद्याचीं फुलें असणार; त्यांच्या परिमलांतही दिवसादिवसाला फेरबदल होत नसतो. म्हणून, आजच्या पेक्षां उद्यां आणि उद्यांपेक्षां परवा त्या फुलांची महती व माधुरी उतरणीला लागून थोडीच नाहीशीं होते? जें फुलांचें तेंच कवनांचें. जिव्हाळ्याच्या भाषेंतच त्यांची खरी थोरवी. त्यांच्या देहीं सळसळणारा अनुभवाचा रसरशीत ताजेपणाच मनाला मोहिनी घालतो.

आतांपर्यन्तच्या विवेचनांत मधून मधून उद्धृत करण्यांत आलेल्या कवनपङ्क्तीवरून हेंही समजून येईल कीं विचारांच्या अभिव्यक्तीसाठीं समर्पक भाषेची कवीजवळ तूट नाहीं. बहुतेक सर्व अभङ्गांतून प्रसादगुणाचा वावर आढळतो; आणि निःसन्देह शब्दयोजना व ती देखील सहजतायुक्त आणि रसपूर्ण अशी

आहे. देवपूजेचें अवडम्बर माजवायला जसा आपल्यापाशीं वेळ नाहीं असें ते म्हणतात तद्वतच शब्दांचा फापटपसारा घालण्याचेंही अनौचित्य त्यांचे हातून घडलेलें सहसा दिसत नाहीं. त्यांच्या इतर विषयावरील काव्यरचनेंतही हें वैशिष्ट्य दिसून येईल. 'ओढ' ह्या कवितेंत "नव्या नवरीचं काळीज" जसें कुशलतेनें दाखविलें आहे तसेंच 'चुटपुट' ह्या कवनांत नवोढेचें मनोविश्लेषणही हळुवार शब्दांनीं यथातथ्यपणें दाखविलें आहे. भावनेचा उथळपणा वा उद्दामपणाही प्रायः कुठें दिसत नाहीं. 'तुझें चालणें' ही कविता सुन्दरीच्या गजगतीचा प्रभाव कळवून घेण्याच्या दृष्टीनें वाचनीय अतएव सुन्दर तर आहेच; पण कवीच्या उपरिनिर्दिष्ट कलागुणाची ही मूर्ति म्हणून प्रेक्षणीय आहे. विशेषतः तिच्या गजगतीची रसिकपणानें स्तुति गाऊन शेवटीं

**ये शङ्का म्हणुनी सांग एकदा खरें**
**पदिं याच किती हृदयांचा जाहला चुराडा बरें.**

ह्या प्रश्नानें दिलेली कलाटणी किती तरी अर्थगर्भ आहे. सौन्दर्याच्या पारधीवृत्तीची तीव्रता आणि तीहि संयमित भाषेनें दिग्दर्शित करणारी ही ओळ कितीतरी सामर्थ्यवान आहे.

वैद्य ह्यांच्या कल्पनाविलासाची यथार्थ कल्पना येण्यासाठीं ढगांचें आयुष्य, रस्त्याचें गाणें आणि धूलिकण ही कवितात्रयी वाचावी. वैद्यांचें कल्पनावैशिष्ट्य दाखविणारीं म्हणून ह्या कवनांकडे अङ्गुलिनिर्देश करतां येईल "तारका" ह्या कवितेंतील—

**पुण्यात्म्यांची पावन दृष्टी करी उघडझाप**
**माया-पाखर मृत आप्तांची ल्याली उडुरूप**

ह्या दोन चरणांवरून समजून येईल कीं, ही कविता दोघा सुप्रसिद्ध गत कविवर्यांच्या 'अरुण'-वर्णनाप्रमाणें उत्प्रेक्षांची मालिका आहे. आतां, हें खरें आहे कीं त्या 'अरुणा'प्रमाणें "तारकां"मध्यें प्रदीर्घता नाहीं. तथापि कल्पनेची केवळ भरारी सिद्ध करण्यापलीकडे त्या प्रदीर्घतेचें दुसरें काय महत्व? नुसत्या उत्प्रेक्षांची गुम्फण म्हणजे काव्य नव्हे. काव्याच्या अनेक व्याख्या प्रचलीत आहेत. त्यांतून सर्वांत सुटसुटीत, सोपी आणि अर्थपूर्ण अशी व्याख्या म्हणजे "संस्मरणीय उद्गार" हीच ठरेल. ह्या व्याख्येंतील अभिप्रेत अर्थ हा कीं, ते उद्गार आपल्या भावनांना

हालविणारे आणि बुद्धीला चालना देणारे असले पाहिजेत. कारण ज्यांच्या योगानें प्रक्षोभन किंवा आन्दोलन होतें तेच स्मृतिपटलावर ठसतात. त्या प्रक्षोभनाला किंवा विकम्पनाला जर कशापासून प्रेरणा मिळत असेल तर ती बोलल्या बोलांतील श्रुतिसुभगता आणि तालबद्धता ह्यांनींच मिळते. श्रोत्याचें अन्तःकरण त्या उद्‌गारांतील ध्वनिसामर्थ्य व मन्त्रमोहिनी ह्यांच्या प्रभाव-सर्वस्वासह श्रुतिसुभगतेच्या आणि तालबद्धतेच्या अङ्कित होत असतें.* ह्या कसोटीवर निव्वळ उत्प्रेक्षामय कवन हें काव्य ठरूं शकणार नाहीं. त्यांतील उत्प्रेक्षांची चढती कमान रसिकाला विस्मयचकित करील; पण हृदयाचा ठाव घेण्याचें किंवा बुद्धीला गती देण्याचें सामर्थ्य तिच्या ठिकाणीं प्रतीत होणार नाहीं. हें लक्षांत घेतां, कल्पना-विलासाबरोबरच इतर काव्यगुणांचा सम्पर्क ज्यांना चांगल्या प्रकारें लागला आहे अशी कवनें, वर म्हटल्याप्रमाणें, ढगांचें आयुष्य, रस्त्याचें गाणें आणि धूलिकण हींच ठरूं शकतात. धनाढ्याप्रमाणें दरिद्री, सौन्दर्यशालिनी-बरोबर अष्टावक्रा, धडधाकटासमवेत लुळापांगळा अशा भिन्नभिन्न गुणधर्मांच्या प्राणिमात्रांना किंबहुना सचेतनाप्रमाणें अचेतनासही समभावानें थारा देणारा रस्ता, मरुभूमीप्रमाणें दहनभूमींतून आणि उपवनाला लागून जाणारा रस्ता, जेव्हां 'इतिहासीं वाचा कीर्ति' असें म्हणतो तेव्हां त्याच्या आजूबाजूला झालेल्या रणधुमाळया आठवूं लागतात. आणि काळाच्या चक्रनेमिक्रमाची जाणीव होते. "धूलिकणां"ची भूमिका देखील अशाच धाटणीची आहे. उद्यानांतील फुलें, त्याचप्रमाणें नामशेष राज्यें वगैरे सर्व माझ्यांत अन्तर्धान पावलीं आहेत, धारातीर्थीं पतन पावलेल्या वीरांच्या रक्ताचा वास माझ्या कणाकणांतून दरवळत

* Of the many definitions of poetry, the simplest is still best; "memorable speech." That is to say it must move our emotions, or excite our intellect, for only that which is moving or exciting is memorable, and the stimulus is the audible spoken word and cadence, to which in all its power of suggestion and incantation we must surrender.

—"*The Poets–, Tongue*"

[ *Edited by W. H. Auden and John Garrette* ].

आहे अशा सारख्या प्रातिनिधिक गोष्टींच्या उल्लेखांनीं, सर्व स्थिरचराची अखेर माती होते हा निसर्गनियम हे धूलिकण काव्यमय भाषेंत साङ्गत आहेत. "ढगांचें आयुष्य" ह्या कवनाला प्रशंसनीय उदात्ततेची जोड मिळाली आहे. खेळकर वृत्तीनें नाचाय-बागडायला निघालेल्या मेघखण्डांचें हें गाणें. आपल्या क्रीडेंतील खोडसाळपणांची त्यांना जाणीव आहे; पण सुरुवातीच्या खेळींमेळींचें व भिष्कीलपणाचें पर्यवसान—

**हाक पीडितांची ऐकुनी धावावें तेथ**
**दुक्खमुक्त करणें ढगांचा हा जीवनपन्थ**
**वरुनी भूवरती, खालुनी पुन्हा नभीं जावें**
**शमवाया दुःखें परांचीं पुनर्जन्म घ्यावे**
**वृत्तीला ऐशा आमुच्या ना आदी अन्त**
**औदार्यासाठीं जन्मलों आम्ही श्रीमन्त.**

अशा उदारमनस्कतेंत झाल्यानें, ह्या गीताला उदात्तता आली आहे. खेळाडू-पणाच्या पार्श्वभूमीवर उदात्ततेची ही बैठक फारच चित्ताकर्षक व तितकीच निरामय वाटते.

वैद्यांच्या कवितांचा परिचय करून देतांना, येथवर केलेल्या त्रोटक गुणाविष्करणाला मान तुकवूनही, 'हें सर्व कवनांत कशाला सांगायला हवें होतें' असा ( दर डाकेला कवितांचा भडिमार होत राहिल्यामुळें बेजार झालेल्या सम्पादकाच्या चिडखोरपणास साजेसा ) प्रश्न कोणी पण्डित करण्याचा सम्भव आहे. कारण थोडेच दिवसांपूर्वीं अशाप्रकारची, काव्याच्या अवश्यकतेबद्दल शङ्का प्रदर्शित करण्यांत आलेली पुष्कळांच्या स्मरणांत असणारच. काव्य ही कृत्रिमता आहे आणि जें सरळ सांगतां येतें आणि सरळपणामुळें सर्वांना आकलनसुलभ होऊं शकतें त्याकरितां काव्याचा आटापिटा ऊर्फ द्राविडी प्राणायाम कशाला, दुर्बोधता कशाला, असा त्या शङ्काकारांचा सवाल आहे. काव्य आणि पद्य ह्या दोन शब्दांचा उच्चार करतांना त्यांचेकडून गल्लत होत असली तरी त्यांना 'काव्य' हा शब्द वापरतांना 'पद्य' असेंच म्हणायचें आहे. कारण, गद्यदेखील काव्यमय असूं शकतें असा त्यांच्या म्हणण्यांतून ध्वनी निघतो-गेयता असलेलें गद्य तें काव्य, एव्हढीच आजच्या काव्याची व्याख्या होऊं.

शकते आणि त्या गेयतेची माधुरी हवीशी होईल तेव्हां जलशा–मैफलींतून ती आम्हांला चाखायला मिळेल; तरी, साहित्यकारानें पद्याचा खटाटोप सोडून द्यावा आणि सरळ गद्याचा अङ्गिकार करावा असा त्यांचा शंकेखोरांचा आदेश आहे.

हें मत म्हणजे केवळ व्यवहार जाणणाऱ्या व्यक्तीचें धोपटामार्गी मत असेल तर तेव्हढ्या दृष्टीनें ठीक आहे; त्याबद्दल फारशी फिकीर करण्याचें कारण नाहीं. पण असल्या रुक्ष, व्यावहारिक आणि धोपटमार्गी मतवाल्यांची वकीली जेव्हां पण्डित म्हणविणारेच पत्करतात तेव्हां नवल वाटतें आणि त्या पण्डितांची खातर-जमाही करणें ( जागा असून झोंपीं गेल्याचें सोंग घेणाराला जागा करण्यासारखें ) कठिण होऊन बसतें. असें वेड पांघरून पेडगांवला जायला हे जे लोक निघालेले असतात ते स्वतः पण्डित असल्यामुळें, ह्यांच्यापुढें कवित्वनिवेदन करण्याचें नशिबीं न येवो असें त्रिवार म्हणून पाय काढता घेणेंही रास्त व्हायचें नाहीं. कारण आपल्या पाण्डित्याच्या जोरावर ते खोटा पक्षही लढवून दाखवितील आणि सामन्य जनांचा बुद्धिभेद करूं शकतील. सबब, त्या पण्डित–वकीलांच्या समजुतीसाठीं नव्हे पण सामान्य जनांच्या समजुतीसाठीं त्या शङ्केला उत्तर देणें अवश्यक आहे.

खरें पाहूं जातां, काव्य पद्याप्रमाणें गद्यांत असूं शकत नाहीं अशी कोणी हाकाटी केलेली आजवर ऐकूं येत नाहीं. काव्य पद्यांत तसेंच गद्यांतही असूं शकतें याबद्दल ज्ञात्यांत मतभेद कधींच नव्हता. आणि ‘गातां येणारें गद्य तें काव्य’ अशी व्याख्या काव्यशून्य कवनांवरून-बहुशा गणेशोत्सवांत सालोसाल खण्डोगणती पिकत आलेल्या पद्यावल्यांवरून–कोणी केली असली तरी, असें आग्रही मतप्रतिपादन कोणी काव्यमर्मज्ञानें केलेलें आढळलें नाहीं. कारण काव्याची, छन्दोबद्ध काव्याची चहा बाळगणारे रसिक निव्वळ छन्दोबद्धतेवर भाळून जात नाहींत. पद्यरचनेंत काव्यगुणाचा अभाव असल्यास ‘ पद्याच्या विटाळयांत कोम्बलेलें गद्य ’ असा तीवर शिक्का मारण्यास त्यांनींही कुचराई केली नाहीं. काव्य, अर्थांत छन्दोबद्ध काव्य, कृत्रिम आणि गद्य तेवढें नैसर्गिक असें म्हणण्यांत तरी कितीसा अर्थ ? तसें मूलतः पाहूं जातां, मनुष्यप्राण्यानें जगांत नान्दावयासाठीं जो अवाढव्य साधनसम्भार निर्माण केला आहे त्यांतच भाषा हेंही एक साधन आहे. आणि ह्या साधनाची अद्वितीयता अशी कीं हें साधनच निर्मात्याच्या मनावर हुकमत

गाजवून त्याच्या भवितव्यतेचा सूत्रधार होऊन बसलें आहे.* सारांश जिचा जन्मच मुळीं कृत्रिमतेंत आहे त्या भाषेचें एक अङ्ग तेव्हढें कृत्रिम आणि दुसरें मात्र स्वाभाविक असा भेद कल्पण्यांत काय सयुक्तिकता? पद्यांत सरळपणाला आणि व्याकरणाला बाधा येते असें म्हणणेंही विचाराअन्तीं अगदींच भरीव नाहीं असें दिसेल. पद्यानें व्याकरणाकडून कांहीं सवलती घेतल्या असल्या तरी दुसऱ्या बाजूनें पुष्कळ प्रकारांनीं भरपाई करून दिली आहे. बरें, सरळपणा गद्यानें तरी सचोटीनें व एकनिष्ठनें कुठें पाळला आहे? हीं पहा पुढील गद्यवाक्यें:—

१. म्हणतो कोण तुझा पक्ष खरा म्हणून?
२. कशाला हवा हा आटापिटा?
३. आधीं जाते बुद्धि मग जातें भाण्डवल?
४. शेळी जाते जिवानिशी आणि खाणार म्हणतो वातड.
५. ज्याचें करावें बरें तो म्हणतो माझेंच खरें.

गद्य वाक्यांत कर्ता-कर्म-क्रियापद वगैरे घटक ज्या अनुक्रमानें येण्याविषयीं व्याकरणाची शिस्त आहे त्याच अनुक्रमानें वरील वाक्यांत त्यांची माण्डणी झाली आहे का? व्याकरणानें वाक्यरचनेसाठीं घालून दिलेल्या अनुक्रमाची झालेली (किंवा हेतुपुरस्सर केलेली) ही पायमल्ली गद्याच्या अकृत्रिमतेचा कैवार घेणारांच्या लक्षांत आली नसेल काय? आणि लक्षांत येऊन देखील ती गद्याभिमान्यांना जर कांहीं हेतुसाठीं आवश्यक वाटत असेल तर पद्यकारांनीं आपल्या कांहीं हेतुसाठीं ती थोडीशी स्वीकारल्यास कृत्रिमतेचा शिक्का पद्यरचनाकारांच्या कृतीवर मारण्याचा अधिकार सवलती घेणाऱ्या गद्याभिमान्यांना तरी काय, आणि तसा शिक्का मारण्यांत प्रामाणिकपणा तरी कुठें राहिला?

वर एके ठिकाणीं दिलेली काव्याची व्याख्या प्रतिपक्षीयांना देखील मान्य होण्यासारखी आहे. कारण, गद्यांतील काव्य कबूल करण्याला त्या व्याख्येचा

* Language rightly considered is but a tool—a tool a man in course of ages has invented and fashioned for his use and benefit.........Indeed no other tool of man's invention has had anything like so profound an influence on his mind and destiny. It is in fact a tool that has educated its maker. —P. B. Ballard.

नोंद नं. ८२०८



प्रतिबन्ध नाहीं, हें Speech ह्या शब्दानें उघड होत आहे. पण त्या शब्दाच्या सभोंवती उभ्या केलेल्या पारिपार्श्वकांकडे दुर्लक्ष करून मात्र चालणार नाहीं. Emotive piece of writing ही व्याख्याही हवी असल्यास घेण्यास हरकत नाहीं. पण ही व्याख्या जिथें देण्यांत आली आहे तिथेंच पुढें केलेला खुलासाही ध्यानांत घ्यायला हवा. त्या खुलाशांत असें म्हटलें आहे कीं 'भावनोत्पादक लेखन' ही व्याख्या अंगाशीं येण्याचा सम्भव आहे. कारण, आपल्या भावनांना डिवचून क्षुब्ध करणाऱ्या सर्वच शब्दांना काव्य म्हणणें धोक्याचें होईल. आपणास आलेल्या एकाद्या तारेंतील त्रोटक आणि उघडे बोडके चार शब्द देखील आपला भावनासागर हेलावून सोडतील; तो इतका कीं सगळ्या विश्वांतील काव्य एकवटल्यानेंही तसा तो हेलावणार नाहीं. Spontaneous outburst of feelings (म्हणजे भावनोद्रेक) ही एक व्याख्या पुढें करण्यांत येते. पण भावनोद्रेकाच्या उद्गारांचीही सूक्ष्म छाननी केली तर ती पद्याकडे झुकलेली दिसेल. पुत्राच्या निधनानें विह्वल झालेली माता जो हम्बरडा फोडते तो काय निव्वळ गद्यात्मक असतो ? "नवरात्र सम्पलें. दसरा उजाडला. मोरूचा बाप मोरूस म्हणाला मोरू ऊठ" हा धडा प्राथमिक शाळेंत ज्या पद्धतीनें वाचण्यास पन्तोजी शिकवतात किंवा छोटे विद्यार्थी शिकतात त्याच पद्धतीनें पुत्रशोकाविव्हल माता आपला टाहो फोडते काय ? भावनोद्रेकाची भाषा साध्या गद्यापेक्षां निराळी असतेच असते. आणि भावनोद्रेकाचा सम्बन्ध नसतांना देखील, साधें गद्य निखालस गद्यासारखेंच वाचलें जावें असा पन्तोजी आटोकाट प्रयत्न करीत असतांनाही त्याचे छोटे शिष्य स्वभावताच हेल व सूर काढूनच वाचत असतात. तेव्हां, अगदीं निर्लेप अशा बालस्वभावाच्या निकषावर देखील, हेल–चाल–ताल हींच असलीं तर भाषेचीं स्वाभाविक अंगें ठरूं शकतील. मग भावनोद्रेक तालबद्ध आणि हेलयुक्त असेलच असेल. शोकाप्रमाणें आनन्दाचेंही उदाहरण घेतां येईल. घरांतील बालकाला नवलाईचें खेळणें किंवा खाऊ मिळाल्यास आनन्दोत्सवाच्या भरांत तें शुभवर्तमान इतर समानशील भावण्डांकडे घेऊन जातांना तो कसा ठेक्यांत नाचत आणि तालासुरांत बोल काढीत जातो तें गद्याच्या वकीलांनीं निरीक्षण करावें म्हणजे त्यांना पटेल कीं नैसर्गिक भावनोद्रेकाचें गद्य तालबद्ध म्हणजे पद्याकडे झुकलेलें असतें.

व्याकरणाच्या शिस्तीचा बोज गद्यांत तरी काय प्रमाणांत राखला जातो हें दाखविण्यासाठीं वर नमूद केलेल्या गद्य वाक्यांकडे जरा सूक्ष्म दृष्टी टाकल्यास, भावनोद्रेकाला प्राधान्य नसतांनाही, त्या वाक्यांतून ताल व नादमाधुर्य साधण्याचा प्रयत्न केला आहे ( किंवा तीं स्वयंभूपणें उमटलीं आहेत ) हें चाणाक्ष वाचकांना समजून येईल. गद्यलेखनांत-अगदीं बाजारभाव, गणिताचीं कोष्टकें, देवघेवीचे दस्तऐवज, कायद्याचीं कलमें, अशासारखे व्यवहाराच्या प्रान्तातले कागदपत्र सोडल्यास-उद्बोधक किंवा मनोरञ्जक व्हावयासाठीं केलेल्या गद्यलेखनांत कला नसते असें तरी गद्याची कड घेणारांना कबूल करायचें नाहीं ना ? पद्याचा मुलाजा न ठेवणारा कोणीही नामवन्त गद्यलेखक "आपल्या गद्यलेखनाला कलेची जरूरी नाहीं." असें कबूल करणार नाहीं. कारण, तें गद्य memorable speech म्हणून गणलें जावें अशी तो आकांक्षा बाळगतो. आणि त्या आकांक्षेसाठीं कांहीं कलाकुसरीची आवश्यकता त्याला असते. मग त्याच कलाकुसरीचा ज्यांत उत्कर्ष साधतां येतो त्या पद्याबद्दलच गवगवा का ?

**१. देवाची करणी, नारळांत पाणी.**<br>
**२. नाचतां येईना अङ्गण वाकडें;**<br>
**रान्धतां येईना ओलीं लाकडें.**

हें गद्य यमकानुप्रासयुक्त आणि तालबद्ध आहे आणि म्हणून तें Memorable speech होऊं शकतें आणि म्हणूनच तें पद्याच्या प्रभावाच्या आहारीं जात आहे असें म्हणतां येतें.

वस्तू म्हटली की तिला तिची कांहीं तरी ठरावीक रूपरेखा आली आणि कला म्हटली कीं कृत्रिमता आली. डोङ्गर म्हणजे मैदान नव्हे किंवा टेकडीही नव्हे; नदी म्हणजे समुद्र नव्हे किंवा नालाही नव्हे; झाड म्हटलें कीं आभाळ नव्हे किंवा लताही नव्हे. सारांश, सर्व वस्तूंची वर्गवारी करतां येण्यासारखें प्रत्येकाला निराळे अस्तित्वनियम आहेत आणि ते नियम असे आहेत कीं एका डोंगरासारखा तन्तोतन्त दुसरा डोंगर न आढळला तरी एकाचें डोंगरपण दुसऱ्यांत प्रत्ययास येतें. कारण त्या परस्परांत कांहीं-ना-कांहीं समाईक एकरूपता असते. तीच गोष्ट नदी, झाड, मैदान इत्याद्यनेक वस्तूंची. कांहीं तरी स्थूल पण विशिष्ट आकार आणि तो एकमेकाहून भिन्न, इतकें निश्चित !

तोच कायदा वाङ्मयसृष्टींत. जग म्हणजे एकजात सपाट मैदान व्हावें असा म्हणणारा कोणी विश्वामित्र निर्माण झालेला नाहीं. वाङ्मयसृष्टींतही एकच एक वाण काढावा असें म्हणणेंही समंजसपणाचें होणार नाहीं. कला म्हणजे कृत्रिमता हें कबूल करून, कलेची गरज आहे असें म्हटल्यावर मग तिचा अधिकांत अधिक परिपोषक विलास दाखवून, पुन्हा कृत्रिमतेचा शक्य तितका अभाव प्रस्थापित करतां आला व स्वाभाविकतेचा आभास उत्पन्न करतां आला तर बिघडलें कोठें? संगीताची तहान लागल्यास ती भागविण्याकरितां जलशा-मैफलीकडे धाव घेतां येईल आणि (बोलताना, तराणे, ह्यांसारख्या) एकाक्षरी किंवा द्व्यक्षरी अर्थविहीन भावनेपासून राग-ताल-सुरांनीं आनन्दही प्राप्त होईल. पण एक टोक अर्थप्रचुर गद्य आणि दुसरें टोक भावगर्भ संगीत ह्यांचा सुन्दर मिलाफ घालून देणाऱ्या कवींची भावार्थरमणीय कामगिरी मात्र त्याज्य अ! कवींना काव्यकलेपासून परावृत्त करण्याच्या खटाटोपाचा उगम, वर जें नाचण्या-रान्धण्यासम्बन्धींचें सुभाषित दिलें आहे त्यांतून तर झाला नसेल ना, असाही संशय येतो.

पद्याची कैफीयत यथासांग माण्डण्यास प्रस्तावनेचीं पृष्ठें पुरीं पडणार नाहींत. आतांपावेतों अगदीं जुजबी-सूत्ररूपानें बाजू माण्डिली आहे. काव्यांत कांहीं सांगावयाचें असतें कां नाहीं, कविता ही एक मनोवृत्ती कशी आहे, कवितेला योजलेल्या चाल-तालांचें मानसशास्त्रदृष्ट्या महत्व काय, शब्दांच्या ठिकाणीं असलेल्या गुणविशेषाला कवितेंतच अधिक उठाव कसा मिळतो, किम्बहुना काव्याला छन्दोबद्ध करण्याची प्रथा पडल्यानें भाषेला श्रीमन्ती कशी प्राप्त झाली, इत्यायनेक मुद्दे अजून राहिले आहेत आणि त्यांचें विवेचन रीतसर करायचें म्हटल्यास स्वतन्त्र ग्रन्थच लिहावा लागेल. प्रस्तुत स्थळीं श्री. वसन्तराव वैद्य ह्यांच्या पुढील कवितासंग्रहांतील एकाच भावार्थाच्या पण भिन्न बाह्यांगाच्या दोन कवितांकडे, (कविता ह्या वाङ्मयप्रकाराच्या समर्थनासाठीं) विशेषत्वानें लक्ष वेधावयाचें आहे.

“सौन्दर्यप्रतीति” आणि “आंत व बाहेर” ह्या त्या दोन कविता होत. प्रिय व्यक्तीच्या प्रेमलाभांत आणि संगतींत (चित्तवृत्ति प्रफुल्लित झाल्यामुळें) नसल्या ठिकाणीं देखील सौन्दर्याचा साक्षात्कार घडतो; उलट प्रिय व्यक्तीच्या

वियोगांत मूर्तिमन्त सौन्दर्यालाही अवकळा आलीसें वाटतें; असा ह्या दोन्ही कवितांचा मथितार्थ आहे. पण " सौन्दर्यप्रतीति " हें कवन " भूपतिवैभव " ( सारख्या, उद्दिष्ट भावनेला तितकेसें अनुकूल नसलेल्या ) जातींत असून, तिला विशिष्ट घडण नाहीं. प्रत्येक पंक्तिद्वयांत कवितेचा मथितार्थ निरनिराळ्या वस्तूंचे दाखले पुढें घेऊन प्रस्थापित केला आहे. म्हणजे, समग्र कविता ही एकाद्या लाम्बट पंगतीप्रमाणें किंवा चाळीप्रमाणें वाटते. उरलीं, दिसलीं, गमलीं, अशा क्रियापदांनीं साधलेला यमकांचा एकसारखेपणा सौन्दर्यहानी करतो; आणि एकुण सोळा ओळींच्या कवितेंत शेवटच्या सहा ओळींनीं एकमेकीचा अनुवाद करीत राहावें ही स्थिति कवीच्या मगदुराबद्दल वाचकास साशङ्क बनविते. ह्याच्या उलट, " आंत व बाहेर " ह्या कवितेला सुनीताची पद्मावर्तनी बान्धणी आणि उदास-गम्भीर शार्दूलविक्रीडित वृत्ताची योजना ही युति अतीशय शुभ-दायक झाली आहे. " आंत व बाहेर " ही द्विदलता जशी कवितेच्या मथळ्यांत व विषयाच्या गाभ्यांत; तशीच ती बान्धणीच्या प्रकारांतही झाली आहे. समग्र कवितेंत दोनच ऋतूंची तुलना केल्यामुळें वाचकाच्या चित्तवृत्ती पांगल्या जात नाहींत आणि कवीस उद्दिष्ट वातावरण निर्माण करण्यास पुरेसा अवसर मिळून त्या त्या ऋतूच्या स्वरूप–गुण–धर्माचा आविष्कार करण्यासारखी ध्वन्यनुसारी शब्दयोजना शक्य झाली आहे. सृष्टीमध्यें वसन्ताचा उद्गम झालेला दाखवितांना देखील प्रणयी दम्पतीच्या नात्याचा आरोप करून, कवितेला प्रतीकात्मक सौन्दर्याची जोड करून देतां आली आहे. अशा प्रकारच्या अनेक सजावटीमुळें ही कविता पहिल्या कवितेपेक्षां अधिक यशस्वी ठरते. सारांश, भावनेला पोषक होईल असा कांहीं विशिष्ट छन्द, भावना व छन्द ह्या दोघांच्या तोलामोलाची भाषा आणि ह्या तिघांची कुचम्बणा न करणारा प्रकार, ह्यांचा संयोग झाला असतां जी कविता उठावदार होते तीच कांहीं अंगोपांगांची नीट जुळणी झाली नाहीं तर थोडीबहुत फिकी पडते हें ह्या दोन कवितांच्या तुलनेवरून रसिकांच्या ध्यानीं येईल. आणि कवितेच्या यशस्वितेचें उपरोक्त पृथक्करण जरी करतां आलें नाहीं तरी ती यशस्विता सामान्य वाचकालाही भासमान झाल्याशिवाय राहणार नाहीं. कविते–कवितेमध्यें हा जर डावा–उजवेपणा सम्भवतो व प्रत्ययास येतो तर गद्य आणि पद्य ह्या ढोबळ प्रकारांत तो कां सम्भवूं नये आणि पटूं नये ?

जें गद्यांत खुलणार नाहीं तें पद्यांत प्रभावी दिसेल; आणि प्रभावशाली होण्यासाठीं गद्यदेखील कवितेचाच अनुनय करतें, हें वर दिग्दर्शित केलेंच आहे.

असो; बहराचा आस्वाद इथेंच आणखीं घेत बसलों तर सूत्रधारानेंच दीर्घसूत्रीपणा लावल्याची कलाहीनता पदरीं यायची. "आतां काय तयाचें, पृथ्वीचा पाळणा, सये मी मोठ्यांच्या घरची, फसवा व्यवहार, मूक राहुनीच" वगैरे किती तरी तुरे-मञ्जिऱ्या आंत लोभनीय आहेत. आणि मृङ्गानें सगळींच फुलें उष्टावलीं तरी तीं देवपूजेला चालतात, हें जरी खरें असलें तरी, दुसऱ्याच्या लुडबुडीशिवाय पारख करतां आली तर ती ज्याची त्याला अभिमानास्पद आणि आनन्ददायक होत असते. सबब, वर नमूद केलेल्या अभिप्रायाच्या पाऊल वाटेनेंच न जातां, अगदीं अधान्तरीं मार्गानें रसिकांनीं खुशाल झेप घालून बहर लुटावा. कवीला औदार्याची किंवा दयेची अपेक्षा नाहीं. मोहरलेल्या वेली मेघांच्या छायेखालीं करपतात आणि उपकारांचे चाप विकासाला मारक होतात, म्हणून मनाला गुलाम बनविणारी भाषा न बोलतां 'परता देऊन शाप' असें त्यांचें साङ्गणें आहे. तथापि आपल्या कवनांची सार्थकता कशांत आहे हें सांगणारें "माझें गाणें" त्यांत जी भूमिका कवीनें पत्करली आहे तीच भावकवीला शोभण्यासारखी आहे. 'कवि स्वताची रडगाणीं गातात' अशी हाकाटी कित्येक पण्डित-टीकाकार करीत असतात. 'भावकवी'ची ओळख त्यांना झालेली असते कीं नाहीं कोण जाणे. The poet writes of personal or fictitious experiences, but these are not important in themselves until the reader has realised them in his own consciousness. The test of a poet is the frequency and diversity of the occasions on which we remember his poetry.

[The Poets' Tongue].

भावकवि. वैयक्तिक सुखदुःखानुभूतींचींच शब्दाचित्रें रङ्गवीत असतो. तथापि त्यांतील महत्व वाचकांच्या गतानुभूतींना जाग येण्यांत असते. वाचकाच्या चित्ताला अगदीं तेच नव्हे पण तत्सदृश विकार-विचार कधींच चाटून गेले नसतील—वाचकांचें चित्त अगदीं बधिरच राहिलें असेल तर कविकृति विफल समजण्याचें कारण नाहीं. हीच विचारसरणी "माझें गाणें" सांगत आहे—

गाणें कसलें ? हृदिंची तळमळ
उत्कट भावांची ही खळबळ
उणें काढितां ममत्व यांतिल
निर्जीव कागदी फूलच तें !

× × ×

पद्यपंक्तिच्या तटांमधूनी
ममानुभूती वाहे भरुनी
कुणी तोषवा तृषार्त यांतुनी
समजेन न सार्थक यापरतें !

* * *

आमची खात्री आहे कीं चोखन्दळ पण्डितांनीं मधुन आधुन नाकें मुरडलीं तरी हा लोकशाहीचा काळ असल्यामुळें, अपेक्षित सार्थक होत असल्याचा कवीला प्रत्यय येईल.

गायकवाड वाडा
५६८ नारायण; पुणें. २
तारिख ११ मार्च १९३६

यशवन्त दिनकर पेण्ढरकर

# बहर

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ..........
ता. ..............
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ५५०६

वसंत

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. ........ नं. ........
ता. ..............
ठाणें.

# भरंवसा

जलनिर्भर आले मेघ जमुन अंबरीं–
भरंवसा एक दिन, मातें सुरु होतिल सरिवर सरी.

मी मीन तटीं तळमळें जलाविण जरी–
उठणार लाट भरतीची आज ना उद्यां सागरीं.

चिरकाल कशी नांदेल इथें शर्वरी?-
आतां न जरा वेळानें रवि राणा येइल वरी.

तरु उभा कधींचा येथें पर्णाविना–
जाईल काल वर्षाचा मधुमासाविण कां सुना?

सांगतें बाळ कां 'भूक मला लागली'?
टळतांच भुकेची वेळा व्याकूळ होय माउली.

वाहतो दयानिल तुझा येथ निशिदिनीं–
जाईल डावलुन माझ्या कां कळीस आवर्जुनी?

१९-६-३४

# निदिध्यास

नसे षोक मज विभवाचा-नको ते विलास:
एकमेव स्वातंत्र्याचा नित्य निदिध्यास !

नको पाठवूं प्रतिवर्षीं येथ वसंताला,
आम्रतरू माझे मुकले जरी मंजरीला,
स्वैर संचरूं दे कंठावीण कोकिळेला,
-परी असो स्वातंत्र्याचा ॠतू सर्व मास !

नको शीत ज्योत्स्ना रात्रीं तारकाधिपाची,
मोहवी न मानस शोभा नभीं चांदण्यांची,
नको मला एकहि दावूं रात्र पौर्णिमेची,
-परी एक स्वातंत्र्याच्या पाठवीं रवीस !

सिंधु-ब्रह्मपुत्रा झाल्या आटुनी सपाट,
सह्य-हिमा जागीं होवो पठारें अफाट,
काश्मिरांत जरि विस्तरलें कच्छ वाळवंट,
-परी असो स्वातंत्र्याचा सदा येथ वास !

जरी वनश्रीची झाली एकजात राख,
नेत्रसौख्यविषयाची ना आज मला भूक,
कलास्थानशून्यहि सारा जाहला मुलूख,
-भाविकाल सौंदर्याची करिल पूर्ण आस !

धूलिकणा ये सोनेरी रंग रश्मिसंगें,
परिस करी लोखंडाची कनकमयीं अंगें,
-तशी पूर्ण स्वातंत्र्यानें तनू जई रंगे
अणूंतही सौंदर्याचा तदा हो विकास !

२१-११-३३

---

# जललहरी

शान्त साजिऱ्या सायंकाळीं
शशाङ्क खेळे खेळ निराळीं.
मोहुन गेली वीचीबाला
नभीं पाहुनी कलाधिपाला;

प्रेमरंगिं मग रंगुन गेली;
खुल्या दिलानें हंसूं लागली.
शर्वरीशही मोहित झाला,
मनोमंदिरीं हर्ष दाटला,

अंशुकरें आलिंगी तिजलाः
फेनमिषें क्षणिं हंसली बाला !
आधिंच यौवन नव त्या काला,
विसरुन गेली परिस्थितीला.

प्रशान्त रजनी, सुरम्य लीला,
बघवत ना निष्ठुर दैवालाः
अघोर लीला खेळायाला
निष्ठुरतेला वाव मिळाला.

कभिन्न काळा पयोद आला
कृष्ण करानें लपवी विधुला.
निशा संपली, कायम झांकळ,
विरहानें हो अंतर व्याकुळ.

क्षितिजावरती सूर्य उदेला,
अंतरली सुखसहवासाला.
गर्जे करुनी स्मित मेघव्रज
अबल, एकली पाहुनियां तिज.

*    *    *    *

## जललहरी

धांवसि ऐसी कां गे बाले ?
धेनुवत्स कीं वारा प्यालें !
सूड घ्यावया बलाहकाचा
प्रयत्न कीं त्या धरावयाचा !

कांठावरती असेल म्हणुनी
आलिस परि तो हांसे वरुनी !

*           *           *           *

हतबल केलें नैराश्यानें !
चेतविलें परि क्रोधाग्नीनें !

सखा लोपतां क्षितिजाखालीं
क्षितिजाच्या शोधार्थ धांवली !
अथांग अंतर तोडायाला
अशक्य म्हणुनी फिरली अबला.

धांवत येतां पाहुन तिजला
अदय किनारा कामुक झाला,
पापी हस्तें तनु स्पर्शिली,
व्यक्तित्वें मग कुठली उरली ?

१५-७-२९

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ७१०५४. ११-२
ता. स्थानक
ठाणें.

# ‘ नर्तकी मी उर्वी-बाला ’

अम्बराच्या गोकुळींचा श्याम तूं मी गोपबाला;
शान्त हा दिक्प्रान्त सारा, रंगवूं ये प्रेमलीला.

हा अनन्ताचा अनादी वृक्ष आला मोहराला,
डोलत्या फांदीवरी ये गोफ बांधूं रंगलेला.

सप्तरंगी तेजरश्मी गोफ माझा गुंफण्याचा,
मत्प्रियाच्या मालकीचें मोकळें नभ नाचण्याला.

मारुनी गिर्‌क्या भरारा भोंवतीं घालीन फेरे.
रंजवीते भास्कराला नर्तकी मी उर्वि-बाला.

गाउनीयां प्रेमगीतां नर्तनीं घेईन चाळा.
प्रीतिचें हें गीत जावो व्यापुनीयां अन्तराळा.

साज माझा शोभवीतीं स्वत्प्रकाशाचींच लेणीं.
प्रेयसीच्या संगतीनें मोल वल्लभवैभवाला.

राहिल्या त्या दूर गोपी, सन्निधीं मी कान्त राधा;
एकटी गुंफीन गोफा विस्मरूनी आत्मतेला.

घालुनी घिरक्या दमूं दे पातकी हा चन्द्र मेला !
चालवूं प्रेमी जिवांची ही चिरंतन नृत्यलीला.

हें अनादी नृत्य माझें, प्रत्यहीं त्या ये नवाई;
तूं गडी रंगेल माझ्या नर्तनाचा सूत्रवाला !

५-१०-३३

# तारका

प्रभा विचरते नित्य निराळीं निशिं नक्षत्रांची–
विभवमंजुषा खुली राहिली जणों यामिनीची !

आकाशाचें कृष्णकमळ ये पूर्ण विकासाला,
दंवबिंदूंचा सडा त्यावरी काय जणूं खुलला !

अष्ट दिशांच्या स्तंभावरती मंडप सजवीला,
किरण छताच्या झरोक्यांतुनी वर्षिति ज्योत्स्नेला !

सुरलोकींची सुमनशालिनी सदाफुली फुलली !
सागर सुकला रत्नें तळिंचीं कीं उघडीं पडलीं !

विधुवनमाळी रासक्रीडा करि गगनोद्यानीं,
फेर धराया तेथ पातल्या कीं गोपी रमणी !

वसुधाबाला खेळ खेळुनी निद्रावश झाली,
जाळिदार ही मच्छरदाणी तिजसाठीं विणिली !

अस्मानी वसनास बसविल्या चंदेरी टिकल्या !
नुपुरांतिल घागऱ्या निशेच्या नकळत वाढवल्या !

पुण्यात्म्यांची पावन दृष्टी करी उघड-झांप !
मायापांखर मृत आप्तांची त्याली उडुरूप !

२४-१०-३३

# रस्त्याचें गाणें

सांगाती मी पथिकांचा;
जिवलग या चरसृष्टीचा;
धरेवरी माझी व्याप्ति;
इतिहासीं वाचा कीर्ति.

कधीं नागमोडी वळणें,
तीरासम सरळहि जाणें;
अफाट नद, नाले मोठे,
स्थिर त्यांवर, झुलतों कोठें;

हरिततृणांकित कधि काया,
सहारांत ती अनलमया;
रात्रंदिन संतत जागा;
मजभंवतीं तरुच्या बागा.

नव्या दमाचा झुंजार
जरठहि घे मम आधार;
रूपगर्विता मजसंगें
अपांग निर्धनता रांगे;

तुफान घोड्यांच्या टापा;
दुर्बलता टाकी धापा;
दैन्यहि घे लोळण पायीं;
लक्ष्मी ही डोलत जाई;

कधीं वराती फुललेल्या
तशा प्रेतयात्रा नेल्या;
कुशीस रात्रीं बिनघोर
निराधार घे आधार;

कुलशीलाला मुकलेलीं
किती अर्भकें जोजविलीं;
श्रीमंती बेदरकार
गरिबांचें फोडी शीर;

अस्थींचें त्यांच्या पीठ
पहा उधळल्या धूळींत;
सुधारणेची भरदौड
करि जीवांची चिरफाड

रुधिरांचे त्यांच्या अमित
डाग पाहुनि घ्या येथ;
पखरण केव्हां सोन्याची,
केव्हां स्फोटक अस्त्रांची,

स्वतंत्रतेची वनराई,
तशीच दास्याची खाई,
– यांतुन फिरतों मी जगतीं
आदीला मिळतों अंतीं !

१७-१२-३३

---

# इन्द्रधनुष्य

नजरबंदि कीं हातचलाखी प्रकाशराजाची
जलबिंदूंवर क्षणैक उभवी माया रंगाची !

निघे यावया सौंदर्याची सम्राज्ञी खालीं–
पायघड्या सोपानपथीं कीं फुलेंच अंथरलीं !

पाचू हिरवे, लाल माणकें, पाणिदार मोत्यें,
–रंग तयांचे आणुन विणिली माला आदित्यें !

कर्णभूषणांतुनी फांकले परतुन वा किरण !
प्रणयसिंधुवर लाट उसळली व्यापाया गगन !

विजयश्री घेऊन परतला कुणी वीरनेता
निसर्ग सजवी तोरण बांधुन स्वागतार्थ रस्ता !

दीप गवसला हारपलेला सृष्टि मनीं खुलली,
उज्ज्वल भावी मार्गाची ही दिंडी तिज दिसली !

*　　　*　　　*　　　*

भूमीवरती मात्र मृगजलें ! इन्द्रधनू कुठुन ?
लोभी जग हें म्हणुनि दूर तें दुनियेपासून.

५–१–३४

# ढगांचें आयुष्य

कितीक दिवसांनीं मिळाली भटकाया सूट,
दूर दूर हिंडूं, करूं मग मौजेची लूट;

उंच उंच जाऊं पांखरूं फिरकेना जेथ,
समीरलहरिवरी नाचुं या सर्वच मनसोक्त;

करुं धिंगामस्ती बसवुनी धाब्यावर शिस्त,
खेळूं स्वैरपणें बलानें होउनियां मस्त;

हादरुनी सोडूं धरित्री करुन कंठशोष,
मैदानावरती नर्भींच्या घालूं हैदोस;

उभवूं प्रतिसृष्टी घेउनी अनेकविध रूपें;
वाघ, सिंह, हत्ती, दाखवूं शरीरविक्षेपें-

अजस्त्र सैन्याची, यमपुरी-भूतपिशाच्चांची;
हरिण-ससे होऊं, करामत दावूं अंगींची;

वसुधापर्यटना निघूं या अनिलाश्वावरती,
दमतां तळ देऊं- आपुलें घर पाठीवरती;

स्थिर होउन पाहूं खालच्या डोंगररानांत
नृत्य मयूरांचें चाललें केकांसह जेथ;

जलबिंदू टाकूं स्वातिच्या समयीं शिंपांत,
-होउन तो मोतीं कुणाच्या रुळेल कंठांत !

आर्त चातकाची उघडली इवलीशी चोंच
वर्षांची तृष्णा भागवूं सलिलकणीं तोंच;

चंद्र सूर्य तारे पिटाळुन लावूं सर्वांना;
ठाण्यावर ठेवूं बांधुनी सन्निध अश्वांना.

आवडता अपुला रोजचा खेळ धुळवडीचा
सायंतनिं खेळूं लुटुनियां गुलाल संध्येचा.

## ढगांचें आयुष्य

फटाकडी पोर बिजलिची आणूं जलशाला,
–नृत्यें नवतीच्या चढतसे रंग मैफलीला !

विरहानें होतां अवनिच्या रवि कासावीस
दूर होउनीयां भेटवूं सजण साजणीस.

इन्द्रधनुष्याचें बांधुनी तोरण मोलाचें
मोद रंग उधळूं करूं या स्वागत थाटाचें.

उभे जागजागीं तपस्वी म्हातारे अचल
मार्ग रोखुनीयां अडवुनी मधें हटकतील–

" ग्रीष्माच्या तापें घाबरी वसुंधरा झाली,
सुचे खेळ कैसा ? भावना का तुमची मेली ? "

उतरूं मग कोणी, राहिले जाऊं निसटून;
उग्र रूप घेऊं, स्थिरचरा टाकूं भिववून.

वृद्धांना अपुल्या पाहिजे दिला योग्य मान.
आनंदें खुलवूं धरित्री तनू कष्टवून.

हांक पीडितांची ऐकुनी धांवावें तेथः
–दुःखमुक्त करणें ढगांचा हा जीवनपंथ.

जातां–जातांना शेवटीं थोडे उरतील,
वाट सौंगड्यांची हिंडुनी तिथेंच बघतील.

वरुनी भूवरती, खालुनी पुन्हां नभीं यावें,
शमवाया दुःखें परांचीं पुनर्जन्म घ्यावे.

वृत्तीला ऐशा आमुच्या आदी ना अंत.
औदार्यासाठीं जन्मलों आम्ही श्रीमंत !

२९–१–३४

---

# पृथ्वीचा पाळणा

संवगडी सूर्याची आनंदी स्वारी
जों न पातली क्षितिजाच्या दारीं-
तोंच धांवली खेळाया बाळी,
तात्काळ खेळांत रंगून गेली.
खेळाया खेळाडू सूर्य लाभला
-खाण्या-पीण्याची शुद्ध कोणाला ?
पिंग्याचा खेळ जीव कीं प्राण !
गिरगीर गिरक्या दमली मारून.
धुडगूस घातला केव्हांपासून
-खेळाया अंगण, दबवी न कोण.
आईनें मारीली हांक रवीला,
दबकत दबकत गेहीं पळाला.
-तेव्हांच संध्या ही खेळाया आली,
-परि तेवढ्यांत तिन्हिसांज झाली.
झोंपेंत दिवसाची दंगल विसरेना.
जो जो रे ! जो जो मम पंचप्राणा !

लेणीं अंगावर निर्झर-सरितांचीं,
थांबली नाहीं रुणझुण त्यांची;
हलकी चादर नीळया जलधीची;
मंजूळ गाणीं वृक्षराजींचीं;
चिमण्या तारांच्या साऱ्या बाजूंला
टांगून ठेवील्या या पाळण्याला;
चंद्राची मिणमीण करि सांजवात
जळते ती झाली जरि मध्यरात;
अनिल हालवी मंद पाळणा.
जो जो रे जो जो मम पंचप्राणा !

## पृथ्वीचा पाळणा

रंगी-बेरंगी चिरड्या बहुमोल
वसंत दादा तुजसी आणील;
इंद्रधनूंचे गजरे वेणीला
मेघांना सांगूं आणावयाला;
हौस पुष्पांची पुरवावयाला
सांगूं या आपण वरुणबालेला;
श्रीमंती असतां घरची अलोट
कसली थोरांच्या बाळांना तूट ?
सारें तें कांहीं पाहूं उद्यांना.
जो जो रे ! जो जो मम पंचप्राणा !

केव्हांची गातें मी अंगाईगीत,
आली न अद्यापी झोंप डोळ्यांत.
शांत झोंपल्या या दिशा दाही:
माझ्याच बाळाला कां झोंप नाहीं ?
दिवसाच्या श्रमानें काया तापली
म्हणुनीच बाळाची झोंप उडाली.
दृष्ट न काढीली मीं संध्याकाळीं,
—खचितच पोर ही मम दृष्टाळली !
मीठ नी मोहऱ्या अजुनी जा आणा.
जो जो रे ! जो जो मम पंचप्राणा !

१९-५-३४

# चोरी

पहावं इकडे इकडे वळुन जरा
बरं कां जाणं परभारां ?
जाच जरि जातां: कोण करी सत्ता ?
काय तें कुठें लांबवीतां ?
नाहिं परवाना जाण्याचा इथुन,
तिळहि ना हालूं देईन.
माल चोरीचा जिरला न कुणाला:
धोंड कां पायांवर घाला ?
हास्य हिरमुसलें, प्रेमधना लुटलें,
पदरिं परि काय पहा आलें !
गार ती हातीं नेतां झांकून:
असे का सांगा उघडून !
समजतां समजा मज पुरती दुबळी:
दिसेना पणिं सापटोळी !
वाटलें अबला सर्वस्वा हरली:
कुणाला अक्कल हो विकली ?
पाहिलं चोरा जातां परभारां,
घातला पदयुगुलीं दोरा.
निराळीं तीर जाइ दृष्टिपार,
सुटेना भूचा आधार.
बावरी दृष्टी धुंडी जग सगळें
दिसेना कुठेंच गांठोडें.
कशाला येतां येतां माघारीं ?
वाटलें जिरल का चोरी ?

२१-११-३२

---

# कांगाव

कां असा कांगाव खोटा–' मी मुळीं ना त्यांतली ' ?
बोलसी–' ही ना दिशा ठावी ',–पदें हीं कोठलीं ?

कस्तुरीच्या सौरभानें रान सारें दाटलें:
बोलसी–' येथें मृगाचे पायही ना लागले ' !

पेरिले पाचू तसा हा शोभला येथें मळा:
बोलसी–' येथें मुळीं ना वारिबिंदू सांडला ' !

साद घाली कोंबडा ये बांग ही दर्ग्यांतली:
बोलसी–' जागी उषा अद्यापि नाहीं जाहली ' !

वेग येती सारखे हे, दाह अंगीं जाहला:
बोलसी–' हा नागिणीनें ना मुळींही डंखिला ' !

झोंक जातो, लाज जाते, दर्प येतो आननीं:
' द्राक्षकन्या '–सांगसी–' आली कधीं ना या जनीं ' !

गुंगवीलें पन्नगाला, क्रौर्य त्याचें लोपलें:
' वेणु ना, ही बर्चि येथें '–त्यास तूं समजाविलें !

५–२–३३

# फसवा व्यवहार

फसवा हा व्यवहार
तुझ्याविण कोणाला सुचणार ?

मुग्धमनाचे माहित नव्हते मज जेव्हां व्यवहार,
त्याच घडीला सौदा पटवुन साधलास व्यापार !

सुटली नव्हती कूस आइची, ज्ञान कुठुन येणार ?
–तोंच आळवुन लकेर केला हरिणीशावकहार !

शिशुत्व नाहीं सरलें, दुर्बल सुचतो हा न विचारः
दूर राहुनी निर्झरिणीला सागर करि बेजार !

पक्क व्हावया गंध घातला मृदुलदलप्राकार
–तोंच फुलांचा अधिर समीरण करि सौरभपरिहार !

ओनाम्याची ओळख नसतां शिकवुन वारंवार
मालकिचा मम लिहुन घेतला मज करवीं अख्त्यार !

अपुरा हत्पट पाहुन नकळत आलासे पटकार,
स्वचित्र त्यावर विणुनी गेला कोण कसें पुसणार ?

चक्रव्यूह हा माहित नसतां आल्यें चालुन फार,
मद्‌हृदयावर तुजविण आतां कोणाचा अधिकार ?

५-४-३३

# फसवा व्यवहार

फसवा हा व्यवहार
तुझ्याविण कोणाला सुचणार ?

मुग्धमनाचे माहित नव्हते मज जेव्हां व्यवहार,
त्याच घडीला सौदा पटवुन साधलास व्यापार !

सुटली नव्हती कूस आइची, ज्ञान कुठुन येणार ?
–तोंच आळवुन लकेर केला हरिणीशावकहार !

शिशुत्व नाहीं सरलें, दुर्बल सुचतो हा न विचारः
दूर राहुनी निर्झरिणीला सागर करि बेजार !

पक्व व्हावया गंध घातला मृदुलदलप्राकार
–तोंच फुलांचा अधिर समीरण करि सौरभपरिहार !

ओनाम्याची ओळख नसतां शिकवुन वारंवार
मालकिचा मम लिहुन घेतला मज करवीं अख्त्यार !

अपुरा हत्पट पाहुन नकळत आलासे पटकार,
स्वचित्र त्यावर विणुनी गेला कोण कसें पुसणार ?

चक्रव्यूह हा माहित नसतां आल्यें चालुन फार,
मद्हृदयावर तुजविण आतां कोणाचा अधिकार ?

५-४-३३

---

# सौंदर्यप्रतीति

जी सुषमा त्वां मज शुक्तींतहि दाखविली
ती गमे आज परि मौक्तिकींहि नच उरली.

जी रम्य चारुता ग्रीष्मनिर्झरीं दिसली
ती कार्तिकांतही तुजविण निष्प्रभ गमली.

जी दिव्य वनश्री रेताडांतहि खुलली
ती तूं नच म्हणुनी काश्मीरावर रुसली.

जो पानांतुनही गंध लतांनीं दिधला
तो परागांतही आतां न दिसे दडला.

जी भीम तमींही गोड यामिनी हंसली
ती चंद्रिकेंत आजला क्रूरता त्याली.

तव मूर्ती होती सन्निध ज्या ज्या वेळीं
सौंदर्यप्रतीती अणूंतही त्या वेळीं.

वस्तूंत कधीं नच सुंदरता मज दिसलीः
त्वत्प्रीतिदर्पणीं सुंदर पृथ्वी सगळी.

सौंदर्य नांदतें कधि कां जड वस्तूंत ?
सौंदर्यप्रतीती प्रीतिबद्ध हृदयांत !

२८-९-३३

## साद व पडसाद

नेत्रकमलिनी मुकी राहिली करुन प्रतीक्षा दिनरात्रीं
तीच खुलविण्या प्रीतिकिरण हे सांठविले माझ्या नेत्रीं.

कंपित जेथें अधरपाकळ्या मजसाठीं झाल्या विकल
विलोल माझे ओंठ उभविण्या तिथें सुधेचे कल्लोल.

करुन प्रतीक्षा माझी दर्या पिसा होय ज्या गालींचा
तुफान करण्या तिथें धांवतो शशाङ्क माझ्या हास्याचा.

आलिंगाया या देहाला आतुर जी लतिका झाली
रोमांचांचे मळे फुलविण्या तिथें सज्ज मी वनमाळी.

हृदयाकाशीं जिच्या घुमतसे माझ्या नांवाची साद
हांक द्यावया अधीर जिव हा उठविल अविरत पडसाद.

सौरभ पसरुन करी प्रियाला पाचारण जैं फुलराणी
येउन फुलवी बाग प्रीतिचे अलि जीवाचा तिच्या धनी !

५-१२-३३

# वेड

मम बोल रुचेना म्हणुनी हंसतां हंसा
हिणवीन परी वदुनी तें – " वेडास प्रीत म्हणतसां ".

ज्यासाठीं इकडे झुरें हृदय निशिदिनीं,
–अन् दुजीच त्याच्या ध्यानीं रात्रंदिन मायाविनी.

वाटतें निशेला चंद्रच माझा धनी,
–परि अलभ्य वसुधेसाठीं चालला तोच खंगुनी.

हा सूर्यच माझा प्राण म्हणे मेदिनी,
–बेजार अंतरीं त्याला करि दुजीच तेजस्विनी.

यन्मूर्ति नित्य मज व्याकुळ करिते मनीं
–दाद ना तयाची त्याला प्रिय दुजीच वरवर्णिनी.

जें दुर्लभ त्याची धरणें आशा मनीं,
ही प्रीत न, वेडच सारें, सांगाया नलगे कुणी.

शिकविलें हेंच मी प्रमेय माझ्या मना,
हें वेडच मजला लावी सोसाया कटु यातना.

परि याच यातना गमती मज सुखखनी,
राहीन नित्य मी ऐशी या वेडांतच रंगुनी.

यानेंच अणू ना गेले वेडावुनी ?
हें वेडच जगवी यांना, ही जीवनजलवाहिनी !

५–२–३४

---

# प्रतीक्षा

[ ' आज दुपारच्या गाडीनें नेण्याकरितां येणार आहें '
असें पत्र आल्यामुळें स्टेशनवर जाऊन
नवपरिणीतेनें केलेली प्रतीक्षा. ]

ते तर येणार मुळीं आतांच दुपारीं,
जायाला पाहिजेच मजला सामोरी.

आज बरी आठवते दादा ! तुज थट्टा !
थांबणार सांग कधीं तोंडाचा पट्टा ?
नाहिं बरी असली ही थट्टा घरिंदारीं.

गाडीला उशिर आज कां व्हावा इतका ?
कधिंच पडुन गेला ना ताराचा ठोका ?
रोज बरी वेळेवर येते नाहिं तरी !

ताठरले डोळे हे न्याहाळुन रूळ:
आजच भरलें कसलें मेलीला खूळ ?
सिग्नलही पडला तो आधीं कित्तितरी !

तारांचे खांब उभे उंच दिवे येथें
बसुनी जर त्यावर मज पाह्याला मिळतें
–तर दिसती गाडी मज येतांना दूरी.

' हां हां म्हणतां अपुलें स्टेशन येईल '
–याच विचारांत मुळीं आतां असतील,
म्हणतिल मनिं–' येइल ती खचितच सामोरी. '

थरथरती गाल जशी दर्यावर लहर !
डावा हा नेत्र लवे केव्हांचा फार !
        अस्थिरतेनें केलें थैमान शरीरीं !

हृदय उडे जोरानें आज कशापायीं ?
वेळेवर बोलाया सुचणारच नाहीं.
        मजसाठीं नेत्र परी वदतिल कांहिंतरी !

*        *        *        *

" कां झाला आज गडे ! गाडीला उशिर ? "
" छे, वेडे ! फारच ती आधीं आज तर !
        थकली कां बघुन वाट राणीची स्वारी ? "

२-४-३४

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ..............
ठाणें.

# संमीलन

मुग्ध कमलिनी शोधित होती आसपास सजणासाठीं,
धनिण जिवाची धुंडित होता शशाङ्क क्षितिजाच्या काठीं;
चुकली दृष्टी परस्परांची, दिसलें नाहीं कोण कुणा,
भेट न जोंवर कशा पटाव्या अंतरिंच्या तोंवरी खुणा ?

प्रणयगीत आळवीत होती वीणा प्रेमळ हृदयाची,
हृदयाकाशीं दुज्या जिवाच्या नादोर्मी त्या गीताची;
हांक मारुनी हुंकाराचा कानोसा होतें घेत;
स्व-भावचित्रें बघण्यासाठीं दर्पण होतें शोधीत;

पूर्णत्वाच्या प्राप्तीसाठीं भुकेजलेली अपूर्णता
प्रेमप्रकाशीं शोधित होती पूर्णत्वास्तव अपूर्णता.
दोघांचीही एकच होती वाट, गांठ सहजीं पडली,
वैधर्म्याचें नांव न तेथें, निमिषार्धीं ओळख पटली.

स्वत्व हरवुनी बसलों केव्हां नाहीं दोघांना कळलें,
परस्परांचें परस्परांनीं दास्य नकळतां पत्करलें.
लाट निमाली जलांत, किंवा भक्ति रमे विज्ञानांत,
मौन संपलें, भाषा नुरली, मावळलें आणि द्वैत !

*         *         *

कच्छरणीं काश्मीर दिसावें अशी दिव्यता दृष्टीला !
असामान्य सामर्थ्य शरीरीं जगासवें झुंजायाला !

२०-४-३४

किरात प्रेम

# आंत व बाहेर

होता पाउस सारखा चहुंकडे मेघांतुनी वर्षत,
होती चावुन दांत कीं करकरां सौदामिनी स्वैरत,
झाडें कोसळती, कडाडुन उठे खायास सारें वन
वाऱ्याचें बघुनी तुफान सहजीं थर्कांप व्हावें मन,
–रानीं डोंगरच्या अशाच समयीं होतों उभीं आपण
हृत्कुंभांतुन सांडली स्मितसुधा तेव्हांच फेंसाळुन,
ओंठाला भिडवून ओंठ कितिदां हास्यौघ तो रोधिला
वर्षाकाल न तो, वसंतच जणूं तेव्हां मला भासला.

आले नाथ वसंत आज अपुले फारां दिसांनीं घरीं,
सृष्टी हांसतसे मुदें नटुनियां जैशी नवी नोवरी;
–आल्यें डोंगरच्या स्थळीं पुनरपी त्या चालतां चालतां:
नाहीं संगत आज ती...हरपली सृष्टींतली चारुता !

माजे घोर तुफान मानसनभीं, विद्युल्लता नाचती,
वाऱ्यानें स्मृतिच्या ढगें हृदयिंचीं गालीं जला वर्षती.

३०-४-३४

## चुट्पूट

होत्यें जाणत मी दुरून दुरुनी त्यांना कधींपासुन
आणी लांबुन कैकदां निरखिलें मी त्यांस न्याहाळुन,
व्हावी ओळख आस ही मम मनीं होती दबा देऊन,
नाहीं फार जरी परंतु हृदयीं होतेंच आकर्षण.

होता पूल निवांत तेथ दिसली त्यांची मला चाहुल,
आलें मन्मनिं दृष्टिभेट अपुली आतां खचित् होईल.

होत्यें जोंवर दूर आणि नव्हते ते नेत्र माझ्याकडे
दृष्टी तोंवर लाविली अविचला मी सारखी त्यांकडे;

धैर्यानें भिडवीन नेत्र नयनां विश्वास होता मला,
येतां सन्निध मात्र जीव पुरता तात्काळ भांबावला.

गुंतें पाउल पाउलीं नकळतां, दृष्टी वळे भूवरी,
डोळा चोळियला, उगा उतरली लज्जाहि मुद्रेवरी.

कां मी बावरलें अकारण बरें ? ते कोण मी कोण वा ?
झाली ना परि दृष्टि-भेट म्हणुनी चुट्पूट लागे जिवा !

३-७-३४

# खुळें प्रेम

लाविलेंस मार्गीं मी मी म्हणणाऱ्यांना,
वेड्यांतच होइल तर मग माझी गणना.

रस्त्यांतुन जाती मदनाचे अवतार
झडली न त्यांकडे तव नजरेची फेर.

तुजसवें एकदां एक शब्द बोलावा
वेतला कितींनीं यास्तव पाठपुरावा,

पाहिलीं तयांचीं मीं हिरमुसलीं तोंडें,
काढिलेस सहजीं हृदयाचे वाभाडे.

ये मनांत शंका हृदयच तुजला नाहीं,
उद्दामपणाची चालहि देते ग्वाही.

जणुं तरुण जगांतिल नांदुरकीचा पाला !
अप्सरा चुकुन ही आली भूलोकाला !

तुज आकर्षाया मजजवळीं नच कांहीं,
फंदांत अशा पडण्यांत अर्थही नाहीं.

रस्त्यांतुन जाती रोज किती तरि पथिक
त्यांच्याच सारखा, त्यांमधला मी एक.

न स्पृहा मला त्वत्समीपही येण्याची,
तुजकडे परंतू सदाच धांव मनाची.

सौंदर्यसंपदा जरि विनयानें खुलते
उद्दामपणावर कधीं कधीं मन बसतें.

जो जनदृष्टीनें दोष ठरविला गेला
आकर्षण करितो माझ्या तोच मनाला.

वाटेंत लागला कडा जरी उत्तुंग
वळविते म्हणुन कां सरिता अपुला मार्ग ?

जा खुशाल राहा सात समुद्रांपार
ह्या होकायंत्रीं तुझी दिशा दिसणार !

२२-७-३४

## तुझें चालणें

किति जपुन टाकिसी मंद मंद पाउलें:
हलकेंच भूवरी यावीं फुलवेलीवरुनी फुलें !

ही नौका हांकारून शीड चालली !
डौलांत डुले वा हंसी ही कुणी सरोवरजलीं !

पद टाकी निद्रा जणूं पापण्यांवरी !
दुखविल्याविना कमलाला कीं मिलिंद केली करी !

चुरडती पदीं आमुच्या जिवाणू किती:
तव पदीं म्हणावें त्यांनीं राहोंत हींच मस्तकीं.

ये शंका म्हणुनी सांग एकदां खरें-
पदिं याच किती हृदयांचा जाहला चुराडा बरें ?

२४-७-३४

# मोटेवरील गाणें*

रिती व्हती मोट धोधो धावतया पाणी;
पवळ्या ढवळ्या चालतया पाटाच्या पाण्यावाणी.

परकाश बी पघा दऱ्याखळींमंदीं गेला;
भिजवीत भुई पाणी गेलं कोपऱ्याला.

तुमापक्षी न्हाई मला जीव बी हा प्यार,
मळा माझा तुमापायीं लक्षूमिचं घर.

फोफावलीं रोपं फुलामागं धरलं फळ;
म्होरल्या बिस्तिरवारीं नेऊं बाजाराला माल.

कमाईनं तुमच्या भुई झाली हिरवीगार
माघारीण साडीसाठीं न्हाई कां रुसणार ?

गेल्या सालीं घुंगुरपट्टा तुमास्नि मी केला
पुतल्या कारभारीणीला अवन्दाच्या सालाला.

तुमापून न्हाई मला अपरूक पैरण,
पाठीवर पघा तुमच्या दसऱ्याला अलवान !

थांबलां कां लाडक्यानों टवकारुन कान ?
माझ्या आधीं दिसली कां र तुमास्नि मालकीण ?

पुरे झालं काम आतां जा र ! इसाव्याला
धनी तुमचा चाकुर आतां धनीणिचा झाला.

२९-९-३४

---

* ही कविता कोलंबिया कंपनीनें ध्वनिलिखित केली आहे.

# ओढ*

पघ देव बुडाला कवाच मावळतिला;
इनवून कितीदां सांगू थोपवूं नग ग मला.
कां न्हाई ठावा न्याव तिकुडला तुला ?
यायच्या घडीला व्होवं दारांत उभं राह्यला !
पान्हवली माणिक सटीसमाशीं जरी
गोठ्यांतुन याया व्होवं भाइर ते येतां घरीं !
भाकरी भुजाया बसतां आले जर
घटकेची सबुर कुणाला ' करपुं दे ' म्हंति ' भाकुर '
मुंडास व्होवं घ्याया मी जाउन
पै पैसा बाजाराचा ठेवती ज्यांत गांठुन !
मी दिसल्यें न्हाई जर कां सोप्यावर
सबबी मग समद्या पाणी उपड्याच ठावक्यावर !
सांगते म्हुनूसटीं नग थोपवूं मला
येळेवर न्हाई कोणी यायचं ग समजूतिला !
रागाचं म्हनूशिल भ्येव इक्तं कां मला ?
काळीज नव्या नवरीचं जनुं ठावंच न्हाई तुला ?

२५-१०-३४

---

* ही कविता कोलंबिया कंपनीनें ध्वनिलिखित केली आहे.

स्थळ प्रत
क्र. ११४२
ता. २५।७।३५
ठाणे.

# मोहनी

अंतरीं न यावें कुणी
पसरली म्हणुनच कां मोहनी ?

मी निघे तुझ्या मंदिरीं,
वाटेंत मोहनी परी—
विसरवी कार्य भुलवुनी.

तनुतेजाचें चांदणें
जें नेत्रचकोरां जिणें
मन हालें नच तेथुनी.

पथिं गुलाब हे डंवरले !
स्थिर नेत्र तेथ जाहले;
मन रमलें त्या उपवनीं.

पाहतां नेत्र कमलिनी
मन जाय भृंग होउनी;
रंगतें भान विसरुनी.

इवलीच खळी हनुवर
जणुं तुफानीच सागर !
मननौका ने वाहुनी !

परि याच मोहनींतुनी
ये प्रभा तुझी फांकुनी;
खुणविसी जणूं आंतुनी.

फसविते तुझी तुज कला
ने अचुक अंतरीं मला;
मोहनी इष्टदायिनी !

२८-१-३५

प्रा-५

## आज

शब्द ओठांतून तेव्हां जो निघाला अस्फुट
तीच माझी शब्दसृष्टी आणि तें सारस्वत.

फेंकिला दृक्क्षेप किंचित्काल तूं माझ्यावरी
तो प्रकाशे सूर्य साऱ्या आज मन्मार्गावरी.

जी स्मिताची रम्य रेखा स्वत्कपोलीं तरळली
चंद्रिकेनें त्याच आतां रात्र माझी शोभली.

गंध निश्वासांतुनी उन्मादकारी वाहला
धुंद गंधें त्या हवा हो जीवनाची आजला.

ज्या छटा तेव्हां गुलाबी स्वत्कपोलीं बिंबल्या
त्या उषेनें आजच्या माझ्या प्रभाती रंगल्या.

गीत तेव्हां जें मुक्यानें गाइलें तूं, प्रेमले !
त्याच गानें विश्व माझें व्यापुनीयां राहिलें.

लाभले जे एकदां त्वत्सान्निधीं सौख्यक्षण
तेच झाले आज माझ्या जीविताब्दाचे दिन !

---

## हिमाङ्गी

आणिली शिवें जी हालाहल सेवनीं
ती शीतलता तव राहे देहांत पूर्ण व्यापुनी !

दृष्टींत सांठली तुझ्या शीतचंद्रिका !
गारवा द्यावया गालीं बहरली पुष्पवाटिका !

तनुकांति तुझी शीतला चंदनापरी;
सहवास सहाग्यामाजी दे शीतलता काश्मिरी !

दे श्वास गारवा जैसा मंदानिल
हास्यांत लाख कारंजीं उधळतात जल शीतल !

ही लावण्याची वाहे मंदाकिनी
वाहतो भरुन दुथडीला अमृतस्रोत जींतुनी !

शिवकंठीं शमली नामें ज्या काहली
त्या शीतलता नामाची नांवांत तुझ्या सांठली !

घडिघडी विषाचे प्रयोग घडती इथें
तव रूपें शीतलता कां म्हणुनीच जगीं नांदते ?

११-२-३५

## शब्दार्थ

सौंदर्य येतीं
	त्वद्देहीं प्रगटून
अक्षरें वाटतीं
	काढियलीं रेखून !
त्वद्हृदय हाच तो
	बनला शब्द तयांचा;
अन् प्रेम अर्थ हा
	साधा एकच त्याचा !

६-६-३५

वा. क्र. ५५०७

# आसुरी प्रीति

कळतात मला भुलथापा—
अर्थात विषाचे स्रोत !

भिरभिरती गगनिं विमानें,
—म्हणतसां ' तुझ्याच सुखार्थ '
मज गमे शिरावर नित्य
तळपती राक्षसी हात !

फिरतात मोटरी वेगें
म्हणतसां ' तुझ्याच हितार्थ '
मजवरि नच ही खैरात;
—नेण्यास वित्त दिनरात.

विहरती सागरीं नौका,
म्हणतसां ' तुझ्या मोदार्थ '
मगरींचें तांडवनृत्य !
नाचती, गमे यमदूत !

संगिनी, मशिनूगन्, तोफा,
' रक्षणार्थ तव घुमतात '
प्राणावरि तुमचा रोंख
संरक्षण सांगुन हेत.

हीं सारीं तारायंत्रें
—म्हणतां ' तव व्यापारार्थ '
जाळयाची गमते तात !
हें गीत भुजगलाभार्थ !

## आसुरी प्रीति

झटती तव विद्यादानीं
म्हणतां ‘ या संस्था नित्य ’
मारुनी मनाचें स्वत्व
दास्याचे देती पाठ.

ठेवून जिवावर हेत
झटतात रक्षणीं हात;
हा सुधामधुर बचनाग !
ही भुरळ कराया घात !

१-८-१९३३

# शान्तिपूजन

गर्दीनें मंदिर गजबजलें
– शान्तीस पुजाया जन जमले !

वखवखलेल्या अगणित तोफा,
तलवारींचा उभाच ताफा,
रुधिरतृषेनें टाकित धापा,
नग नरमुंडांचे किति रचिले !

पायदळांची अखंड पंक्ति,
घोडदळांचे संघ दौडती,
भव्य विमानें नभिं गुरगुरतीं,
मंत्र हे गाति जणुं स्तुतिभरले !

स्फोटक अस्त्रें फुटुनी उडतीं,
ज्वालाग्राही द्रव्यें जळतीं,
विषवायूंचे धूर कोंदती,
मंदिरांत हा तर धूप जळे !

फोडिति रणशिंगें किंकाळी,
करिति नौबती एकच टाळी,
भेसुर भरले नाद निराळीं,
करितात आरती भावबळें !

## शान्तिपूजन

नरमांसाचा प्रसाद करुनी,
वरि शुद्धीस्तव रुधिर शिंपुनी,
राज्य-लालसा प्याया पाणी–
देवीस देउनी तोषविलें !

सत्तामदिरेचे घट भरले,
आकांक्षांचें कुंड धडकलें,
बंधुत्वाचें सर्पण जळलें,
'जय शांति' रवें नभ दुमदुमलें !

जिवंत जाळुन चितेंत जीवा,
अस्थींची हे करिती सेवा,
सत्यं शांतिचा उडवुन धुव्वा,
म्हणतात – 'शांतिनें जग भरलें' !

१८–११–३३

## ‘जगण्यासाठीं हें मरणें’

घराघरांतुन रडें कोंदलें ज्वान जिवांच्या हानीचें
– त्याच घडीला शिंग गर्जलें गडावरी स्वातंत्र्याचें!

सुतरुधिरानें भूमीवरच्या कणाकणाला रंगविलें
– सौभाग्याचे टिळे कपाळीं मायभूमिच्या ते झाले!

भूगर्भी घे गाडुन काया त्याग न हा का वृक्षाचा?
फुका खुले का सहकाराचा विलास वरच्या बहराचा?

धारातीर्थी मातेसाठीं पडल्या तरुणांचें कण्हणें
अणू अणू उठवील सांगुनी – ‘जगण्यासाठीं हें मरणें’!

हौतात्म्याच्या पायावरती उंच हवेली विजयाची!
स्वातंत्र्याच्या कळसाखालीं उभी इमारत त्यागाची!

मरणद्वारांतुनी निघाला वीराचा जीवनपंथ!
तलवारीवर शीर उडालें विलीन हो अमरत्वांत!

११-१-३४

# 'आतां काय तयाचें ?'

एक काळ शास्ते होतों आम्हिच अमुचे
- आतां काय तयाचें ?

दगडास एकदां होतें तेज हिऱ्याचें
- आतां काय तयाचें ?

अत्तरें जाळुनी केलें हरण तमाचें
- आतां काय तयाचें ?

एकदां जगद्गुरु होते पूर्वज अमुचे
- आतां काय तयाचें ?

वीरशौर्यें दणकत होते ऊर अरींचे
- आतां काय तयाचें ?

रक्षिलें मानधन करुनी दान जिवाचें
- आतां काय तयाचें ?

अटकेवर झेंडे होते फडकत अमुचे
- आतां काय तयाचें ?

*　　*　　*

कालची रात्र चंदेरी संपुन गेली
तळपे तीव्र उन्हाळी !!

वर्तमान म्हणतो - ' नाहीं कांहिंच तुमचें,
तुम्ही दास परांचे. '

स्मृतिशेष वैभवा स्मरुनी चुकतिल कैसे
जळते खंदक पुढचे ?

१९-४-३४

# लायकी

त्वत्प्राणविसांवा व्हाया मज कुठली लायकी ?

लक्करें न पुरतीं अंगीं,
रूपहीन मी हतभागी :
– श्री स्वयें दटावुन सांगे तुजवरती मालकी !

वीणेविण घे मी तान,
हांसतो काक ऐकून :
– गातसे शारदा गाणीं, तीच तुझी लाडकी !

वासहीन माझें फूल,
कृमिही न घेत चाहूल :
– करि झूल उषा सुमनांची तुजसाठीं मंचकीं !

दारीं न येउं दे कोणी,
होईन कशी मग राणी ?
जी योग्य पदीं नच, वांछी ती स्थाना मस्तकीं ?

तूं थोर, हीन मी बाला;
– परि वरिलें अंतरिं तुजला !
घे दैन्य, सोड मानाला मज द्याया लायकी.

तूं भिल्ल भिल्लिणीसाठीं;
गवळीहि गोपिकांसाठीं;
घे धांव जाणुनी प्रीती ठरवाया लायकी.

मनिं ध्यास तुझा घेईन,
तोंवरि तव चिंतिन दैन्य
– ज्या दिनीं वदसि बिलगूनी ‘ तूं माझी लाडकी ’ !

२२-२-३३

# 'सये! मी मोठ्यांच्या घरची'

सये ! मी मोठ्यांच्या घरची ॥ ध्रु० ॥

चंद्र-तारका हींच भूषणें
नित्य वापराचीं.

माजबंध मज इन्द्रधनूचा,
वेढी चपलेची.

उषारक्तिमा कुंकुम जमवी
मजसाठीं प्राची.

प्रभातमाळिण करी प्रतिदिनीं
फुलवेणी माझी.

घनदोल्यावर दे मज झोंका
लहरी वाऱ्याची.

मना रिझविती नृत्य गायनें
रत्नाकरवीची.

सूर्यशिपाई करी नोकरी
देहरक्षकाची.

फुलबगिचा मम नित्य फुलविते
बाला वरुणाची.

## 'सये! मी मोठ्यांच्या घरची'

वसंत करि मम वाटेवरती
पखरण पुष्पांची.

रंगमहालीं करी सजावट
सृष्टि चारुतेची.

आवडती मम दासि विनम्रा
सुता सागराची.

अनंत भू-जल-आकाशावर
सत्ता स्वारीची.

ब्रह्माण्डें हीं अखिल अणूंसह
माझ्या हक्काचीं.

भगवंताच्या प्रियकरिणीला
उणिव जगीं कसची?

१–५–३३

# अभय

पापी मी पतित पतित
प्रभुजी मज दे अभया. ॥ ध्रु० ॥

संध्येची सुंदरता,
अवसेची भीषणता,
– सारखीच प्यार तया. ॥ प्रभुजी... १

सरसिं नील नाहतसे
पंकीं का तो न वसे ?
सम त्यां कुग्राम गया. ॥ प्रभुजी... २

कंटकवन बाभळिचें,
चंदनबन गंधाचें,
– सम त्यांची ज्या छाया. ॥ प्रभुजी... ३

संतहृदयिं प्रभुराणा;
दुष्टमनीं वास कुणा ?
मृग-शूकर एक जया ॥ प्रभुजी... ४

वैकुंठीं वास करी,
राजदण्ड नरकिं धरी,
दावुं नका मजसि भया. ॥ प्रभुजी... ५

लाभो मज निरयगति,
त्याची मुळिं नच भीति;
काया मम ईशमया ! ॥ प्रभुजी... ६

अघराशी मी असल्यें,
जरि स्वर्गा अंतरल्यें,
–नरक तयाची किमया ! ॥
प्रभुजी मज दे अभया. ७

३०–६–३३

---

स्थळ प्रत
सं. ........ नं. ..........
ता. ..............
ठाणें.

# भावबल

कां शिणवुं तनू हिंडण्यावरी ?
ये आपण होउन तूंच घरीं.

खुशाल जा मम दारावरुनी
दिव्य चंदनी रथांत बसुनी,
भुलव जगाला विभव दावुनी,
– येणार न मी परि सामोरी !

भोळि बिचारी ती निर्झरिणी
उदधि शोधितां जाते अटुनी,
– इथेंच बसुनी श्रमांवांचुनी
उभवीन सहज मी सुखनगरी !

प्रेमाचें मम बल घे बघुनी,
आणिल तुजला इथें खेंचुनी.
दोरी माझ्या हातीं असुनी
कां पतंग शोधूं गगनभरी ?

दैन्य कशाला ठेवूं लपवुन ?
मुळीं न ठेविन अवगुण झांकुन,
आल्यें जन्मा रूपच हरवुन,
– परि करिन तुझी मी बरोबरी !

मुजऱ्यांची खैरात जरि तुला,
म्हणशिल – 'दासी करीन इजला'
कोण पुसे तव अधिकाराला ?
गाजवीन सत्ता तुझ्यावरी !

१-३-३४

# प्रीतीचें नातें

हें एकच नातें ध्यानिंमनीं–
‘ तूं नाथ – तुझी मी प्रियकरिणी ’ !

उच्चासनिं तूं आरूढावें,
आणि काय मी दासी व्हावें ?
नातें असलें कुणिं मानावें ?
चल ठेव मान्यता आवरुनी.

सान-थोर हा भेद कशाला ?
समर्थ तूं, ही मी नच अबला,
तूट न माझ्या प्रेमधनाला,
सुख-विभव लोळतें मम चरणीं !

व्यर्थ आदरा देतां थारा
पडेल भीतीचा बंधारा,
प्रवाह राहिल थबकुन सारा;
– घे थोरपणांतुन सोडवुनी.

प्रीतीचा फुलबाग बहरला;
भीड, लाज वा भेद कशाला ?
समभावें बिलगुनी गळ्याला
चल प्रीतीमय राहूं बनुनी.

प्रेमसमाधी ऐक्यभावना
ठावी प्रियकर-प्रियकरिणीला !
उगाच कां मग नातीं नाना ?
स्वामिनी तुझी, मम तूंच धनी !

१–३–३४

## माझा परमेश

नामाचा गजर चाले देवळांत,
– शिरे न कानांत परी माझ्या.

पालख्या, पताका, दिंड्या आणि मेळे,
– पाहती न डोळे पाहूनियां.

जाणत मी नाहीं पुजाबिजा कांहीं,
– स्तुतीशब्द नाहीं उच्चारीत.

मूक राहुनीयां वाहतों मी ओझें
घेतलें जें माझें म्हणोनियां

'गुंतला संसारीं'-म्हणे आला गेला –
'देवा विसरला जन्मदात्या'

म्हणोत बापुडे, नाहीं अवसर
मला अवडंबर घालावया.

कर्तव्यें नटला माझा परमेश,
नाहीं अन्य ईश ठावा मज !

२२-३-३४

## सत्य आणि भास

साउली स्वतःची धांवलों धराया,
गेले परी वाया यत्न सारे.

धांवतां धांवतां झालों मी बेजार,
राहिलें अंतर तेवढेंच !

ध्यानीं आलें जेव्हां वैयर्थ्य यत्नाचें.
हसूं आलें माझें मला तेव्हां.

कवटाळिलें माझें मला मींच जेव्हां.
आलिंगिली तेव्हां साऊलीही.

कल्पनेनें केला निर्माण ईश्वर,
भेट जन्मवर नाहीं त्याची !

धुंडाळिलें जेव्हां माझें मीं अंतर
तदा 'मी' 'ईश्वर' कळों आलें !

कुणीं आतां ध्यावी भासासाठीं धांव.
प्रत्यक्षाचा ठाव हातीं येतां ?

२३-५-३४

# मूर्तिपूजा

फूल आणि माती, हिरा गारगोटी
भेद ऐसा पोटीं नाहीं तुझ्या.

कोण परी अर्पी गारगोटी माती
न हर्ष वा खंती जया तुला ?

आणितों पुजेला मला जें जें प्यार,
माझें जें सुंदर तेंच तुझें.

पूजा-अर्चा माझ्या मनाचें पारणें
फिटायाकारणें व्याप सारा.

तुझ्यासाठीं नाहीं निर्मिलें मीं तुला,
-मिळो आवडीला वाव माझ्या.

नेसविते साडी बाहुलीला बाळी,
हंसूं कुण्या गालीं ओसंडतें ?

सगुणपणा आली माझीच आवड,
माझे मीच कोड पुरवीतों !

सौंदर्याचा माझ्या जिवाला हव्यास,
-काय निर्गुणास चाड त्याची ?

१०-७-३४

# भाग्यवन्त

इच्छिल्यावांचून केलें तुवां दान,
मोलही कल्पून कल्पवेना.

इंन्द्रियें हीं सारीं मिळालीं अव्यंग,
केवढें हें भाग्य थोर माझें !

लाखाच्या मोलाचे डोळे आणि कान
जिणें ज्यांवांचून व्यर्थ सारें.

रूपही मिळालें साजिरें सुंदर,
काय हे उपकार थोडे झाले ?

विश्वाचेंही यावें स्वामित्व ज्यामुळें
सामर्थ्य आगळें दिलें ऐसें !

तुझ्याच तोलाचें लाभलें ऐश्वर्य
आणिक तें काय मागायाचें ?

जन्माला येतांना आलों भाग्यवन्त,
वरूं याचकत्व कशासाठीं ?

२६-७-३४

---

## देव

शिरीं आपत्तींचा कडेलोट झाला,
असह्य साहिला अन्यायही,

गिळीले दुःखाचें धैर्यानें उमाळे,
-परी न हा खळे अश्रूपूर.

उमगलें नाहीं दुःखाचें कारण,
-उलट उधाण सागराला !

होइना कोणीही घ्यावया तयार
दुःखाचा या भार थोडा माझ्या.

'अति नाहीं दुःख बरें' -कोणी म्हणे-
'बघा शराबानें स्वल्पावेल.'

आणि शब्दांसवें आला पुढें पेला,
मीही स्वाहा केला तात्काळ तो.

आपदा न झाली जरी माझी दूर
कमी दुःखभार झाला मात्र.

विचारिलें- 'काय मद्याचें या नांव?'
म्हणाले-, 'या देव संबोधिती'!

२-१२-३५

# विरोध

त्यजावा जीव मोलाचा जिवाचें मोल व्हायाला !
फकीरी बाणतां अंगीं उभी श्री नित्य सेवेला !

शिरीं वाग्बाणवृष्टी ज्या मुक्यानें येत सोसाया
यशाच्या पुष्पराशीची तयाला लाभते शय्या !

धरित्री सस्यसंपन्ना जळे जैं ग्रीष्मतापानें !
किरीटीं स्थान लाभाया सहावी आंच सोन्यानें !

तुटाया पाश देशाची बनाया पाहिजे कारा !
करावी आस सौख्याची असावें दुःख आधारा !

कृमी कोशांत तंतूंच्या स्वतःची कोंडितो काया
तयाला लाभती तेव्हां फुलांचे पंख हिंडाया !

चिरंजीवी सती व्हाया चितेची जोड जोडावी !
हवासा वाटला सर्वां मरे तो हो चिरंजीवी !

खरा तो एक संन्यासी रमे जो विश्वसंसारीं !
न मानी लोकरीतीला तयाला लोक अनुसारी !

२७-३-३२

स्थळ प्रत
सं. ५१०५ ११५२
ता. २४।७।७८

# हिरकणी

वेळ लागला गड सोडाया टळल्या तिन्हिसांजा,
जीव टांगला घरीं, लागला दिंडी-दरवाजा.

स्मृति मातेला हो तान्ह्याची धडधडला ऊर,
दूर झोंपडी, मधें आडवे कडे रान किर्र.

चित्र रंगलें डोळ्यापुढती बाळाचें रडवें,
सृष्टि आळवी सुतविरहाच्या गीताचें कडवें.

पान्हा सुटला, अश्रुजलाचा बंधारा फुटला;
अधीर झाली पोटीशीं त्या ध्याया तान्ह्याला.

वाटा साऱ्या बंद—सांपडे श्वापद जाळ्यांत,
कडा एकला तिला दाखवी मायेचा पंथ.

बांधित होते सुर भूवरती येण्या सोपान
प्रयत्न फसला, कडा राहिला-ही त्याची खूण !

कडा नव्हे तो, दरी नव्हे ती—मूर्तिमन्त मरण
पाउल तेथिल धडधडणाऱ्या अग्नीला सरण.

दाट काजळी रात्र पसरली, घोंघावत वारा,
प्रीतीच्या राज्यांत मिळेना भीतीला थारा !

पदर खोवुनी हात घातला दगडकपारींत,
सरसर आली खालीं, सरली तिची काळरात.

माय भेटली मुलास अपुल्या गोष्ट घडुन गेली;
त्याच कड्यावर इतिहासानें अजरामर लिहिली.

प्राणाचीही करि न सुतास्तव मातृहृदय कदर,
खोल दरीचा कराल जबडा हो प्रेमाधार !

२-५-३३

## ‘ परता देऊन शाप ’

[ जगानें आपली कींव केलेली स्वाभिमानी माणसाला सहन होत नाहीं. उपकार हें दयेचेंच अपत्य आहे. ]

आवरा दयेची छाया सोसूं द्या तीव्र ताप !
अंगाची होवो लाही
म्हणणार न त्राही त्राही, ।
प्रतिकार शक्ति मम अंगीं येऊं द्या आप आप !
शिरिं यथेच्छ हाणा लाथा
ठेवीन ताठ हा माथा,
नच लावा उपकारांचे हृदयाला मात्र चाप !
मेघांच्या छायेखालीं
करपती बहरल्या वेली,
ध्या काढुन झांकळ सारी फुटतिल त्या कीं अमाप !
औदार्य दयेची बोली
करितसे जिवाची होळी !
कां शिरीं व्यर्थ हें घेतां हत्त्येचें घोर पाप ?
भडकली आग बाजूला,
द्या अवसर मम यत्नाला,
लागुं द्या सुवर्ण कसाला, ओतुं नका तींत आप.
अभिमान कराया खची
आयुधें सज्ज हीं साचीं
मम गुलाम मन बनवाया हा तुमचा सर्व व्याप !
या भयें निर्जनीं जातां
कां तेथ मागुतीं येतां ?
हा कुण्या जन्मिचा दावा ? परता देऊन शाप.

१५-२-३४

---

## मजूर

मूठ दिवसांतुन एक चुरमुऱ्यांची
आणि त्यावरती अंजुली जलाची,
दिवस रात्रीं मग राबवा कितीही
श्वास कष्टाचा सोडणार नाहीं !

घरादाराची आस ना अम्हांला,
पुरे तुमचा फुट्पाथ झोंपण्याला.
गगनचुंबी घ्या घरें बांधवून,
चित्र कष्टाचें बघूं साभिमान !

नको अंगाला स्पर्शही सुताचा;
ताप-थंडी सारखा भास त्यांचा !
तलम वस्त्रें बहुमोल घ्या विणून,
तुम्हांपुढती हे कःपदार्थ प्राण !

मार्ग आक्रमण्या वाहनें नकोत,
पृथ्विपर्यटना असति पद समर्थ.
मात्र तुम्हां वाहनें वेगवान
—देऊं बांधुन हें रक्त आटवून !

नको पोटाला पोटभरी अन्न-
पुरें जितक्यानें जगेल हा प्राण.
देह जोंवर मातीस ना मिळाला
—उभे धनिकांचे छंद पुरविण्याला !

## मजूर

दुवा देऊं आम्हीच तुम्हा अंतीं
आणि जाइल होऊन देह माती !
कारखाने, गिरण्याहि एकजात
स्मारकें हीं आमुचीं मूर्तिमन्त !

जनक आम्ही सौंदर्य विलासांचे;
तुम्ही मालक त्या आमुच्या कृतींचे !

२५-५-३४

## झांशीची राणी

दादाः मुक्या बाहुलीसंगें बोले कोण पोर वेडी ?
चालली जशी मेलगाडी ?

बहीणः पंडित तूं जरि तुला परंतू नाहिं कळायाची
आमुची भाषा वेड्यांची !

दादाः तोंड न उघडी तिला भरविते घासावर घासः
जेवते कशी तासतास !

बहीणः तोंड वासुनी जेवायाचें नाहीं कळत तिला;
शोभते मचमच तुम्हांला !

दादाः हात न हाले, पाय न हाले–निर्जिव ही पुतळी
नेसावी तिज साडी चोळी !

बहीणः लोकांपुढती नाचुन करण्या उगा हातवारे
न भरलें वेडाचें वारें !

दादाः 'सोनुकली ही बाळी माझी' म्हणे ठोकळ्याला
निकामी म्हणति सर्व ज्याला !

बहीणः हीच निकामी काय बाहुली ? ( बोलुन तितक्यांत
–घातली तीच कपाळांत ! )

गरीब दिसली निवांत बसली जरि देवावाणी
तरी ही 'झांशीची राणी' !

१३–७–३४

---

# जिवाची परवशता

" मुखत्यार असें मी माझा " तूं कोण असें वदणार ?–
" मी कोणाचाही नाहीं कवडीचा देणेदार "
पांचही महाभूतांचे
शिरिं पर्वत उपकारांचे,
अधिकाधिक वाढायाचे,
ते दूर कसे होणार ?

" व्हावा न कुणा मजसाठीं तिळमात्र कधींही त्रास "–
कष्टली काय नच माता वाहून तुला नउ मास ?
शैशवीं कोण सांभाळी ?
प्रौढत्वीं तुज प्रतिपाळी ?
शेवटीं कोण कवटाळी ?
तूं सदाच भूला भार.

प्रेमाच्या दृढ तंतूंचें विश्वांत पसरलें जाळें,
तूं त्यांतच गिरक्या घेसी, व्यक्तित्व तुला नच उरलें.
जग सदाच वाकवणार
लादून शिरीं उपकार,
ते दूर कराया भार
–शत जन्म नाहिं पुरणार !

" मी स्वतंत्र, पाश न एक मज समर्थ बांधायाला;
बांधला न मी कोणाचा, सुखदुःख कुणाचें मजला ? "
जन्मला न तूं तुजसाठीं,
स्वातंत्र्य तुला नच जगतीं,
राबवील तुजला नियती
–चालण्या विश्वसंसार !

१६–७–३४

## धूलिकण

कःपदार्थ मी तर मजला नाहिं मुळीं मोल;
परी मीच व्यापुन उरलों सर्व ब्रह्म गोल !

नामशेष राज्यें केलीं
लावण्यें दुर्लभ असलीं
मजमधेंच अंतीं विरलीं
सर्व यथाकाल !

आजचे विलास फुलांचे,
विभव तसें फलभारांचें
उद्यां रूप-गुणही माझे
अंगिकारतील.

रक्षणीं जयांच्या पडले
गडि असंख्य हिंमतवाले
लाखाचे नृपती असले
बघुन येथ घ्याल !

आदि-स्थिति-अन्त जगाचा
खेळ सर्व मज एकाचा,
अर्थ काय पार्थिवतेचा ?
अंतिं सर्व धूळ !

१६-७-३४

## संकटास

संकटा स्वैर करी संचार !
बे सावध मी सावध अथवा
कशास तुजसि विचार ?
बहिर्दृष्टिला कलि तूं साक्षात्
अंतीं हित बघणार !
भयद काजळी मेघां पोटीं
जीवन अपरंपार !
दैवी संदेश सुधा जगता
तूंच एक देणार !
ये अंधारी रात्र घेउनी
नभिं तारा संभार !
निरोपिसी सर्वस्व देउनी
जरि म्हणती पेंढार !
धृतिहीरक घ्यावया भरविला
महिवर तूं दर्बार.
कुणी उघडिलें सांग धरेवर
सुगुणरत्न भांडार ?
परमेशाच्या पादशाहिचा
तूंच खरा आधार !
जन्म घडीची जानी दोस्ती
आठव वारंवार !
वसंत तूं, तव करित प्रतीक्षा
हा येथें सहकार !

६–९–३४

## माझें गाणें

गाणें हें माझें मजपुरतें
नच आग्रह काव्य म्हणा यातें.

पद पंक्तींच्या तटांमधूनी
ममानुभूती वाहे भरुनी
कुणी तोषला तृषार्त यांतुनी
समजेन न सार्थक या परतें.

गाणें कसलें? हार्दिंची तळमळ,
उत्कट भावांची ही खळबळ,
उणें काढितां ममत्व यांतिल-
निर्जीव कागदी फूलच तें?

पढवा पोपट, ओढीलहि री,
केकांचीही त्या न माधुरी;
कढ हृदयाचे भेदक ते जरि-
आनंदप्रतीती अनुभवि ते!

सुख दुःखें मी माझीं गाइन
-हृदय आपुलें बोलें यांतुन-
कुणा वाटलें ऐसें ऐकुन,
मम नांव विसरुनी जा पुरतें!

३-१२-३४

# कीर्ति

पाठलाग मी करीत असतां धांवत होतिस पुढें पुढें,
दृष्टि-भेट मग कुठली केवळ पाठच होती अम्हांकडे !

धूम ठोकुनी धांवुं लागलों अंतर अधिकाधिक वाढे,
दिवस लोटले, महिने सरले, गेली टप्प्या पलीकडे.

वैतागानें तोंड फिरवुनी चालुं लागलों उलटिकडे;
कुणीं बोललें ' पाउल मागें पावलावरी बघा पडे !'–

म्हटलें, दृष्टी नाहीं आतां फिरायची इकडे तिकडे;
खुशाल या मागुतीं परी मम पाठच आतां तुम्हांकडे !

अनन्तांतल्या लकाकणाऱ्या ताऱ्यावरती नजर जडे;
भूवरल्या या रमणीसाठीं अन्तर आतां नच ओढे.

*　　　*　　　*

तो तर गेला परी फिरे ती गात तयाचे पोवाडे;
भेट-दर्शनावांचुन ही कधिं बेफिकिरीवर प्रेम जडे !

३–३–३५

# जाणतें बाल्य

[ परिस्थितीची जाणीव आपल्या मुलाला जणुं
उपजतांच झाली आहे असें अनाथ
मातृहृदयाला वाटत असतें. ]

चालूं दे लीला, बाळा ! चालूं दे लीला,
लीलांनीं या येई माझ्या धीर जीवाला.

जन्मतांच आलें ज्ञान
सांग सोनुल्या कोठून ?
ध्यास माझ्या रक्षणाचा खेळांत तुला !

मुठी घट्ट वळुनी देसी
धाक सांग बा कोणासी ?
तिट्कारा हा दुर्जनांचा इतका कां तुला ?

चालविल्या टाळया टाळया
कुणा बरें पिटाळाया ?
पाठलाग आपत्तींचा एव्हां कशाला ?

काय बोबडे बोलून
माझें करीसी सांत्वन !
जाण काळजीची माझ्या केवढी तुला !

रडें जातसें लोपूनी
समीप मी येतां क्षणीं;
दुःख रडयानें आईला नको व्हायला !

बसायासी कडेवर
सदाचाच तूं अधीर;
उतावीळ इतकी कां रे मोठें व्हायला ?

कर्तव्याचा दिला कोणी
धडा अशा लहानपणीं ?
काळजी निराधारांची खरी देवाला !

१८-३-३५

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ..........
ता. ..........
ठाणे.

# सौंदर्य दृष्टि

हवें कशासाठीं आतां सोबतीस कोण ?
येत वाट मजला माझी तुजमुळें दिसून !

सान्तांतिल पन्थहि सान्त
तेथलाच मीही पान्थ,
हाच अमरपन्था पन्थ–
जाय दिलें ऐसे मजला तूंच समजवून !

पन्थ अन्तराळीं कुठले ?
परी पांखरूं का चुकलें ?
किती जरी फाटे फुटले
काढिसी बहुत्वीं माझें एक ओळखून !

शवें तोयदांचीं शिजतीं,
नाचतीं पिशाच्चें भवतीं,
मशाली विजांच्या हातीं,
माग काढिसी शान्ताचा तूंच अशांतून !

स्थळें रम्य जीं जीं दिसतीं
मुकीं आणि जड जीं गमतीं
बोलकीं पुरी तुज पुढतीं
भाष तुझ्यावांचुन त्यांची ये न आकळून

## सौंदर्य दृष्टि

बिलगली जिला नश्वरता
अशी येथली सुंदरता,
शिकविलेंस परि तूं आतां
नश्वरास शाश्वत करणें आत्मसात् करून ?

किती काल सरुनी गेला
प्रवास हा परि नच सरला;
जोड तुझी मिळतां मजला–
आज दिसूं लागे माझें ध्येय मज दुरून !

५–५–३५

## उन्हाळा

गुलाबाचे ज्यांच्यावरि घडिघडी सिंचन घडे,
सुगंधी वाळयाचे लटकति असे जेथ पडदे,
परांच्या गाद्यांचे थर कनक पर्यंकिं रचिले,
तरीही ग्रीष्माला तिथुनच शिव्या शाप सगळे !
–गुलाबी थंडीचे सुखद दिन सारेच गमती,
फुलां पानांनीं ते दिवस बरसातींत नटती,
निदाघीं अंगारा अविरत परी ओकति दिन,
सुखाच्या निद्रेचें मग निमिषही सौख्य कुठुन ?–

भुकेनें हो जागी कडकडुन ती आग उदरीं,
उन्हाच्या आगीच्या धडधडति ज्वाला तळिं, वरी,
अशा काळीं पोटास्तव फिरुन दारिद्य दमलें
कृतज्ञेनें ग्रीष्मास्तव निशिं परी अश्रु झरले !–
नको झोपेसाठीं वळचण नको पांघरुण वा
निराधारांची बा ! तुजसम न अन्यांस परवा ?

२३–५–३५

## ‘ मूक राहुनीच ’

सांकळून अंतरीं भाव राहिले किती
मूक राहुनीच बोलके करूं तयांप्रती.

रूढ भाष लौकिकी
जेथ होतसे मुकी
होउनी अवाच होऊं तेथले बृहस्पती.

दशदिशांस ओरडा
ऐक होत केवढा!
शब्द तेथ, काष्ठसे महापुरांत, मिसळती.

शब्द हे न, या विटा
रचिति भोंवतीं तटा,
अजाणता जिवास जीव हळुहळू दुरावती.

सूर्य आणि वसुमती
भाष यांस कोणती?
दूर मूक राहुनीहि ऐक्य सौख्य भोगिती.

शब्द मोहनींतुनी
सत्य जाय निसटुनी,
फसावया पदोपदीं हवी कुणास भाष ती?

खोल खोल अंतरीं
स्पंदनें किती तरी,
वैखरीस न कळतां करूं तदर्थ संगती!

एप्रिल १९३५

५०८

REFBK-0005504
REFBK-0005504